# माणूस

शनिवार । ३० जून १९७९ । ७५ पैसे


## बजाज-ऑटोमधील गोळीबाराच्या निमित्ताने

देशातील औद्योगिक अशांतता वाढते आहे, हां हां म्हणता परिस्थिती हाताबाहेर जाऊन जगातले हे दहाव्या क्रमांकाचे औद्योगिक राष्ट्र ती आघाडी खिळखिळी होताना पहात आहे. अजून या अशांततेने देशव्यापी स्वरूप धारण केलेले नाही; पण तुरळक व स्थानिक उद्रेक, दैनिकात येवोत न येवोत, सतत कुठे ना कुठे होतच आहेत आणि त्याकडे दुर्लक्ष करणे परवडण्यासारखे नाही.

बजाज-ऑटोला परवा आकुर्डीला झालेल्या गोळीबारात तीनजण ठार झाले. हा उद्रेकही राष्ट्रीय संदर्भातून अलग करता येणार नाही. कामगार, व्यवस्थापन आणि सरकार यांच्या परस्पर असामंजस्यातून टाळता न येण्यासारख्या घटना उद्‌भवतात, त्या साचत जातात आणि मग वरवर क्षुल्लक दिसणाऱ्या कारणाने भडका उडतो. याची जबाबदारी कोणत्याच घटकाला टाळता येणार नाही.

बजाजला काय झाले ? सतरा जूनचा गोळीबार अचानक झाला, त्याची कारणमीमांसा पहाणे आवश्यक आहे.

बजाज-ऑटो कारखाना एक प्रचंड फायदा मिळणारा कारखाना आहे. भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कठीण परिस्थितीला त्याला तोंड द्यावे लागेल असे दिसत नाही. गेल्या पाच वर्षांत विक्री २० कोटींवरून ५९ कोटींवर गेलेली आहे हे भारतीय उद्योगाच्या संदर्भात अपवादभूत उदाहरण आहे. प्रचंड खपाची शाश्वती आहे, स्कूटर्सची वेटिंग-लिस्ट गेली दहा वर्षे वाढतेच आहे. अशा परिस्थितीत कामगारांची परिस्थिती मात्र चांगली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

कामगारांकडून निर्मितिक्षमतेची अवाजवी अपेक्षा हे येथील असंतोषाचे प्रमुख कारण. २२ जानेवारीच्या Business India मध्ये संपूर्ण बजाज-उद्योगसमूहावरच एक प्रचंड अभ्यासपूर्ण लेख आलेला होता. त्यातही कामगारांच्या याच तक्रारीचा उल्लेख आढळला. निर्मितिक्षमता (Productivity) म्हणजे काय ? तर एखाद्या कामगाराने एका दिवसात किती जॉब्स करायला हवेत, हे कंपनी ठरवणार. त्याच्या या कार्यक्षमतेशी त्याचा पगार, बोनस हे निगडित रहातात. उत्पादनाशी कामगारांना करारान्वये जोडण्यात आले, यात प्रत्यक्षात होते काय ? आज बजाजमध्ये मोठ्या प्रमाणात कामगार टेंपररी म्हणून घेतले आहेत, ते आपण पर्मनंट व्हावे म्हणून न झेपेल एवढे काम करतात. समजा, अशा कामगाराने ५० जॉब्स दिवसात केले, तर व्यवस्थापन ५० जॉब्स हीच प्रत्येकाकडून किमान अपेक्षा ठरवणार. आणीबाणीच्या दरम्यान तर ही निर्मितिक्षमता फारच जाचक ठरली; पण तेव्हा रूपमय चटर्जी हे तेथील कामगारनेते तुरुंगात होते त्यामुळे आणि एकूणच दडपशाही असल्याने कोणी त्याविरुद्ध बोलू शकले नाही. मात्र आणीबाणीनंतर आणीबाणीपूर्व परिस्थिती निर्माण करा, अशी मागणी करण्यात आली. यात नवीन मागण्या अगर कंपनीवर नवीन बोजा कोणताही पडणार नव्हता; पण ते घोंगडे भिजतच पडले. दरम्यान चंदू सायकर, बाईकर, कुरेशी आणि जाधव या चार कामगार-कार्यकर्त्यांना सस्पेंड करण्यात आले.

या साऱ्याचा परिणाम म्हणून मागच्या वर्षी जुलै–ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये ४५ दिवसांचा संप झाला. या संदर्भात व्यवस्थापन व कामगार यांच्यात तडजोड व्हावी म्हणून बगाराम तुळपुळे यांचा लवाद नेमावा अशी सूचना कामगारांतर्फे पुढे करण्यात आली. ती व्यवस्थापनाने का फेटाळली हे त्यांनाच माहिती; पण त्यामुळे समझोता दूर राहिला. सुशीलकुमार शिंदे हे मजूरमंत्री. त्यांच्याशी वाटाघाटीही झाल्या; पण तोडगा निघू शकला नाही.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा ४५ दिवसांचा संप शांतपणे चालला. परवाच्या गोळीबारामागे 'कामगारच प्रक्षुब्ध झाले, त्यांनी पोलिसांची चटणी उडवली असती' अशी जी कारणे देण्यात येतात, त्यांनी या संदर्भात याची दखल घ्यावी.

मार्च ७९ ला आणीबाणीत झालेल्या कराराची मुदत संपली. आता औपचारिक दृष्ट्याच नवीन करार सुरू होणे आवश्यक होते. कामगारांनी परत निर्मितिक्षमतेच्या जाचक अपेक्षा सौम्य कराव्यात अशी मागणी केली. याविषयी बोलणीही सुरू झाली.

पण बाबा भिगारदिवे नावाच्या स्थानिक कामगार युनियन-नेत्याला गेटसमोरच मारण्यात आले. मग कामगार खवळले. त्याला कोणी मारहाण केली याची चौकशी व्हावी, अशी मागणी पुढे आली; पण जुजबी अटक तेवढी या प्रकरणी होऊन पोलिसांनी ती झटकल्यातच जमा केले.

त्यात व्यवस्थापनाने आता चालू असलेली निर्मितिक्षमता (जी आणीबाणीत एकतर्फी ठरवण्यात आली होती) तीच १००% धरा मग ७५ रु. वाढ देऊ आणि त्यापुढे मग बोलू अशी भूमिका घेतली.

परिणामत: १ जूनपासून रोज १ तास टूल डाउन सुरू झाला, तो ७ जूनपर्यंत चालला; पण बोलण्यांसाठी खुले वातावरण असावे म्हणून ७ जूनच्या कामगारांच्या जनरलबॉडी मीटिंगमध्ये टूल डाउन मागे घेण्याचे ठरले. ७ जून ते १५ जून काम व्यवस्थित सुरू झाले. १६ जूनला भिगारदिवे आणि बावधनकर यांना व्यवस्थापनाकडून शो-कॉज नोटिसा आल्या. शो-कॉज नोटिस ही चार्जशीटच्या आधीची औपचारिकता असते. त्यामुळे कामगार परत अस्वस्थ झाले. या दरम्यान आधीच्या चौकशीचा निकाल लागला. जाधव आणि कुरेशीला डिसमिस् करण्यात आले, वाईकरला परत कामावर घेण्यात आले आणि सायकरवरची चौकशी अजून चालूच आहे. कामगार चिडले आणि भिगारदिवे आणि बावधनकर यांच्या शॉप्स-मध्ये टूल डाउन सुरू झाला म्हणून या दोघांना बोलावून व्यवस्थापनाने समज दिली. मग कारखान्यातले सगळेच कामगार टूल डाउन करून बागेमध्ये आले. इथपर्यंत परिस्थिती स्फोटक नव्हती. सिक्युरिटीने मात्र लगेच पोलिसांना बोलावले. पोलिसांची व्हॅन आली आणि सरळ शॉपमध्ये घुसली.

कामगारांच्या मानसशास्त्राचा विचार करता शॉपमध्ये पोलिसांनी सरळ घुसणे त्यांना न आवडणे स्वाभाविक होते. भिगारदिवे आणि बावधनकर गडबड नको म्हणून कामगारांना शॉपमध्ये चला म्हणून आग्रह करू लागले. व्हॅन आतून वळून तोपर्यंत बाहेर आली होती. कामगार शॉपमध्ये चालले ते आपल्याला घाबरूनच अशा समजुतीने पोलिसांनी शौर्याने त्यांचा शॉपपर्यंत पाठलाग केला आणि आत अश्रूधूर सोडला. मग कामगारांनी जॉब्स उचलून फेकायला सुरुवात केली. आत तुंबळ हाणामारी जुंपली आणि पोलिसांनी काही चालत नाही असे पाहून माघार घेतली. या पराभवाचा वचपा दुसऱ्या दिवशी निघणार होता.

रात्री नऊ वाजता व्यवस्थापनाने कुलूप ठोकले. या वेळेपर्यंत वीजकपात जाहीर झाली. गडबडीची बातमी ऐकून रूपमय चटर्जींनी रात्री व्यवस्थापनाला फोन करून सकाळी मी येतो मग कारखाना उघडायची चर्चा करू असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १७ तारखेला कारखाना वीजकपातीमुळे बंदच राहणार म्हणून व्यवस्थापनाने बसेसही सोडल्या नाहीत. त्यामुळे फक्त स्थानिक कामगार कारखान्यावर हजर झाले. हे कामगार पहिल्या शिफ्टचे होते. आदल्या दिवशीचा गोंधळ फक्त दुसऱ्या व तिसऱ्या शिफ्टच्या कामगारांशी संबंधित होता हे महत्त्वाचे.

वीजकपातीमुळे ले-ऑफ जाहीर केल्यावर व्यवस्थापनाने कार्डस् जे पंच करतील (म्हणजे जे हजेरी नोंदवतील) त्यांनाच ले-ऑफ पीरिएडचे पैसे मिळतील असे जाहीर केले होते. वस्तुत: त्याचीही जरुरी नव्हती आणि जर जरुरी होती तर बसेस का सोडल्या नाहीत ?

कारखान्याच्या गेटबाहेर कामगार जमले होते. कार्ड पंच करायला एका वेळी आठहून अधिकांनी आत जायचे नाही असे पोलीस व सिक्युरिटीने जाहीर केले. का तर परत गडबड होईल. या वेगाने हजार-दीडहजार कामगारांना हजेरी लावण्यासाठी दुपार उजाडली असती. म्हणून कामगार अस्वस्थ झाले. चंदू सायकर रूपमय चटर्जींना फोन करण्यासाठी केबिनमध्ये गेला. तेवढ्यात पोलिसांची कुमक आली. सिक्युरिटीनेच त्यांना बोलावले होते. चटर्जींनी मी येतो, कामगारांशी बोलतो असे सांगितले व ते निघाले. तेवढ्यात इन्स्पेक्टरने हात वर केला आणि गोळीबार सुरू झाला. वस्तुत: मधल्या मैदानात अश्रुधूर, लाठीहल्ला यांनीही कामगार पांगले असते; पण SRP च्या मदतीने कामगारांना पळायला जागा नाही अशा ठिकाणी पकडून गोळीबार सुरू झाला.

कमरेखाली गोळीबार करावा असा आदेश असतो; पण दत्तात्रय पाडळे याला छातीत गोळी लागून तो जागच्या जागी मेला. तो पुढे होता. दुसरा इब्राहिम हा कामगार हॉस्पिटलमध्ये मेला. जखमी मात्र सगळे पायांना गोळ्या लागून झाले. पाडळेला तो रक्ताने माखलेला असता SRP ने खेचला न् त्याचे प्रेत ओढत न्यायला सुरुवात केली. एवढे झाल्यावर कामगार शांत राहणे शक्य नव्हते. मग मात्र पुरा गोंधळ उडाला.

९००० चा जमाव अनावर झाला असे खोटे वृत्त काही वृत्तपत्रां-


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकोणिसावे
अंक : पाचवा
३० जून १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

मध्ये आहे. मुळात एका शिफ्टचे कामगार किती ? (बसने येणारे आलेलेच नव्हते) आजूबाजूचे बघे किती हे लक्षात घेतले पाहिजे.

रुपमय चटर्जी वाटेतच ट्रॅफिक जाम झाल्याने अडकून पडले. ते पोचू शकलेच नाहीत.

बघ्यांच्या व इतर कामगारांच्या सायकली जप्त करण्यात आल्या. त्यांना व जखमींना आरोपी करण्यात येणार हे नक्की.' भाई वैद्यांनी नंतर शांतता पाळण्याविषयी कामगारनेत्यांची मीटिंग घेतली. या नंतरच्या मलमपट्टीने काय होणार ? जेव्हा कायदेशीर मार्गाने लवाद नेमा म्हणत होते, तेव्हा ऐकले नाही, टूल डाउनला बघले नाहीत. आता शांतता कशी प्रस्थापित होणार ?

धरपकडीला सुरुवात झालीच आहे, मग न्यायालयीन चौकशीला काय अर्थ उरतो ? चौकशीत जे दोषी ठरतील त्यांनाही शिक्षा आणि लहरीपणाने पोलिसांनी ज्यांना पकडले त्यांनाही शिक्षा हे अजब आहे.

मध्यंतरी पाच कारखान्यांच्या व्यवस्थापनाच्या पुढाकाराने डेव्हिड ब्राउनच्या लाठीहल्ल्यानंतर हत्यारी पोलीस कारखान्यात ठेवावेत अशी मागणी करण्यात आली होती. हा व्यवस्थापनाचा कामगारांवरचा विश्वास. कामगारांना नासधूसच करायची असती तर कारखाना भस्मसात झाला असता. त्यांनी मशिनरीची जाळपोळ केली नाही, आठ फूट उंचीवरचे ऑइलचे टँक पेटवले नाहीत. कार्डस् गेटवर का उपलब्ध झाली नाहीत ? गोळीबार प्रथम हवेत, मग पायावर का झाला नाही ? त्याच्या किती फैरी झाल्या ?

संबंधित पोलिसइन्स्पेक्टर त्या भागात कुप्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या केवळ दर्शनानेच कामगार तापतो हे याआधीच्या सुभजय किंवा तत्सम प्रकरणांवरून जगजाहीर असता इन्स्पेक्टर का पाठवायचा ? या सर्व प्रश्नांना उत्तरे काय ?

पर्मनंट होण्याच्या आशेने राबणाऱ्या टेंपररी कामगारांची निर्मितिक्षमता हीच सर्वांची किमान पातळी म्हणून जाहीर करायची आणि त्याच्याशी पगार निगडित करायचा, त्या मानाने पगारही मुळातच काही प्रचंड ठेवले आहेत असाही भाग नाही. या सर्व गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. पंचवीस-तीसच्या वयोगटातला कामगार बजाज ऑटोमध्ये बहुसंख्येने आहे, हाही मुद्दा व्यवस्थापनाने लक्षात घ्यायला नको का ? त्यांना दिली जाणारी वागणूक जगातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या (दुचाकी स्वयंचलित वाहनांच्या उत्पादनात बजाज जगात दुसरी आहे : Business India Jan. 22) कारखान्यातल्या कामगाराला साजेशी आहे काय ? 'टाइम' च्या मलपृष्ठावर देण्यात येणाऱ्या प्रत्येक अंकाच्या जाहिरातीला एक लाख रुपये खर्च करू शकणाऱ्या आणि टाइममध्ये जाहिरात देऊ शकणारी एकमेव भारतीय कंपनी असणाऱ्या बजाजमध्ये ही परिस्थिती का असावी ?

१९८२ च्या जूनपर्यंत दोन लाख स्कूटर्स, तीस हजार मोटारसायकल्स आणि पंचवीस हजार टेम्पो दरवर्षी निर्माण करण्याची राहुल बजाज यांची मनीषा आहे. (कंपनीचे चेअरमन) तसेच पुढल्या पाच वर्षांत जगातली सगळ्यात मोठी स्कूटर कंपनी व पुढल्या दहा वर्षांत दरवर्षी पाचशे कोटी रुपयांची विक्री करायची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

या सगळ्याचे श्रेय फक्त व्यवस्थापनाचेच आहे काय ? ही महत्त्वाकांक्षा ठेवावी अशी परिस्थिती आज कोणामुळे निर्माण

पृष्ठ २३ वर

## सप्रेम नमस्कार....

◻ 'सा. माणूस'चा एकोणिसावा वर्षारंभ अंक (किसान कामगार विशेषांक) आताच संपविला. दरवर्षी विशेषांक (वर्षारंभाचा) काढता. तोही वेगवेगळ्या आणि जिवंत विषयांवर. ह्याबद्दल आपले व आपल्याला साथ देणाऱ्या सहकारी लेखकांचे अभिनंदन.

हा संपूर्ण विशेषांक वाचताना जाणवले ते असे की, साप्ताहिके वा विशेषांक म्हणजे भेळीसारखे वा मसालेभातासारखे चटकदार व चविष्ट असलेच पाहिजे, अशा जमान्यात आपण हे धाडस कसे करता ? खपाचा विचार करता की नाही ? माझ्यासारख्याला असले विशेषांक चालतात; पण इतरांचे काय ? की 'माणूस' परिवारात अशीच माणसे (वाचक) आहेत काय ?

श्रीमती छाया दातार यांचा 'डावा पर्याय : पश्चिम बंगालमध्ये पंधरा दिवस' हा प्रदीर्घ लेख (की छोटा प्रबंध म्हणू !) फारच छान आहे. प. बंगाल समजून घेण्यासाठी उपयुक्त असा. श्रीमती दातार यांनी प. बंगालमधील 'वैद्य' ह्या जातीचा उल्लेख केला आहे. ह्या जातीबद्दल अधिक माहिती दिली असती तर फार बरे झाले असते. कारण ब्राह्मण, कायस्थ ह्या जाती ठाऊक आहेत; पण मला तरी 'वैद्य' ही जात नवीन वाटली (अज्ञानाबद्दल क्षमस्व).

१४ जून — चं. र. राजे
डोंबिवली

◻ 'साप्ताहिक माणूस', दि. १६।६।७९ चा अंक मिळाला. आजच्या अंकामध्ये 'केरळात काय घडत आहे ?' ही श्री. विनय हर्डीकर व श्री. सतीश कामत यांची लेखमाला सुरू झाली आहे. केरळातील सद्यःस्थितीचे— तेथे प्रत्यक्ष जाऊन— लिहिलेले, यथार्थ दर्शन घडविणारे चित्रण देण्याची कल्पना फारच छान वाटली. आपले तसेच श्री. हर्डीकर व श्री. कामत यांचे अभिनंदन.

केरळ प्रांतात प्रांतप्रचारक म्हणून संघाचे मा. ॲड. श्री. भास्करराव कळंबी काम पहातात. गेली जवळजवळ तीस वर्षे ते तेथे संघाच्या कामासाठी आहेत. आपले श्री. हर्डीकर वा श्री. कामत श्री. भास्कररावांना भेटलेच असतील वा भेट घेतीलच. त्यांच्याकडून खूप माहिती मिळेल व अनेक गोष्टींवर प्रकाश पडू शकेल असे वाटते.

१६ जून — श्री. के. जोशी
विलेपार्ले, मुंबई

(हर्डीकर–कामत श्री. कळंबे यांना भेटलेले आहेत. पाच तास मुलाखत झाली. शिवाय त्यांच्या सोबत हर्डीकर–कामत यांनी संघाचे एक शिबिरही पाहिले. हा वृत्तान्त लेखमालेत यथाक्रम येईलच.)

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# । चला पंढरीला जाऊ ।

प्रतिवर्षी येणारी ज्ञानेशांची पालखी यंदाही हजारो वारकऱ्यांसह सोमवारी ज्येष्ठ वद्य नवमीस पुण्यात प्रवेश करती झाली. प्रतिवर्षीप्रमाणे तिच्या स्वागतास पुण्याचे मेयर उपस्थित होते आणि प्रतिवर्षीप्रमाणेच हजारो नागरिक पालखीच्या दर्शनासाठी तिष्ठत होते. जागोजागी स्वागताच्या कमानी उभारल्या होत्या आणि पुष्पकरंडक टांगले होते. स्पीकर्समधून कधी नव्हे त्या अभंगाच्या रेकॉर्डस ऐकू येत होत्या. कुठे वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवले होते. खाण्याच्या पदार्थांच्या गाड्या जागोजागी उभ्या होत्या. फुग्यांचे हिरवे–तांबडे–निळे रंग तरंगत होते.

दरवर्षीची आमची पद्धत अशी की आम्ही पालखी येते त्या फर्ग्युसन कॉलेज रस्त्याने चालत राहतो. पालखी जिथे भेटेल तिथे थांबून दर्शन घेऊन सावकाश परततो. त्याप्रमाणे आम्ही संभाजीपूल ओलांडला आणि डे. जि. पोस्टावरून भांडारकर रस्त्याच्या चौकात आलो. फर्ग्युसन कॉलेजकडून सुटे सुटे वारकरी येत होते. पुष्कळांच्या हाती पताका होत्या. काही स्त्रियांच्या डोक्यांवर तुळशीवृंदावने होती. बहुतेकांच्या डोक्यांवर गाठोडी होती. हातात काठी होती आणि पायांत पादत्राण होते, नव्हते. आमच्या प्रत्येक पावलाला समोरून येणारी ही गर्दी वाढत होती. फर्ग्युसन कॉलेजच्या पलीकडील झाडीचा भाग हे आमचं क्षितिज झालं होतं आणि त्या क्षितिजावर पालखी उगवण्याची प्रत्येकजण वाट पहात होता.

आणि खरोखरीच, सूर्य उगवण्याआधी लाली येते तसे भगव्या पताकांनी क्षितिज झाकाळलं. पालखीच्या दिंड्या अंगावरून जाऊ लागल्या. टाळमृदुंगांचा ध्वनि निनादू लागला. असंख्य मुखांतून बाहेर पडलेल्या अभंगांच्या शब्दांनी वातावरण भरले. दिंड्यातून रंगून रंगून भजने चालली होती. नाचत–बागडत, खेळत दिंड्या थबकत होत्या, पुढे सरकत होत्या. पहिली तुकाराममहाराजांची पालखी अंगावरून गेली. मग ज्ञानेश्वरांची आली. दुरून तिच्या रथाचा कळस चमकला. 'पालखी आली–पालखी आली!' लोक ओरडले. आम्ही पालखीजवळ गेलो. लोकांच्या झुंडी पालखीवर झेप घेत होत्या. आळंदीपासून पुण्यापर्यंत पालखीबरोबर येणारे पुणेकर स्त्री–पुरुष आपल्या श्रांत चेहऱ्यांमुळे वेगळे दिसत होते. थकव्याबरोबर त्यांच्या तोंडावरची धन्यताही कळत होती.

केवळ आळंदीपासून पुण्यापर्यंत पालखीबरोबर चालत येऊन त्यांना धन्यता वाटावी यात काही चूक नाही. त्यांत अहंकारही नाही. मी तर म्हणेन की ज्यांना ही पालखी पहायला मिळते ते भाग्यवान! ज्यांना आळंदीपासून पुण्यापर्यंत पालखीबरोबर येता येते ते आणखी भाग्यवान आणि जे आळंदीपासून थेट पंढरपूरपर्यंत पालखीबरोबर जातात ते परम भाग्यवान!

या सगळ्यांना भाग्यवान म्हणण्याचे कारण पालखीच्या बरोबरची ही वाटचालीची यात्रा जगातील एकमेव पादयात्रा आहे. हिच्यासारखी नितांत सुंदर यात्रा कुठेही नाही. मी पालखीबरोबर गेलो होतो तेव्हा मुंबईचा एक मोठा फळव्यापारी मला म्हणाला, 'भारतातील सर्व यात्रा मी केल्या आहेत. सर्वत्र मी फर्स्टक्लासने गेलो. माझ्याजवळ पैसा आहे; पण ही पंढरपूरची पायी यात्रा, हिला तोड नाही! इथे तुमच्याजवळ कुणी काही मागत नाही. इथे पिरट्या घालणारे पंडे नाहीत. देवाचं भजन करीत आनंदानं चालत रहावं. रात्री प्रवचनं–कीर्तनं ऐकावीत. 'आनंदच आनंद!!'

□

पालखीबरोबर चालत जाण्याचा आनंद कशात आहे हे मी पाहू लागतो तेव्हा माझ्या प्रथम हे लक्षात येते की, खेडेगावाला मुकलेल्या असंख्य शहरवासियांना निसर्गाचा आनंद मिळविण्याचा हा एक मोठा अवसर मिळतो. पालखीबरोबरच्या पंधरा दिवसांत घरच्या सर्व काळज्या विसरल्या जातात. मन ताजेतवाने होते. आरोग्याच्या दृष्टीने पाहिले तर या वाटचालीच्या यात्रेसारखी यात्रा नाही. शहरातील धुराने व्याप्त, कुजट, कुबट हवेतून मुक्तता होऊन दीडशे मैल आणि पंधरा दिवस स्वच्छ निर्मळ हवा सेवन करायला मिळून तुमचे आयुष्य वाढते. रोग पळून जातात. माझ्या अनेक परिचितांना मी ही कारणे सांगून पालखीबरोबर जाण्यास उद्युक्त केले आहे. मी सर्वांना सांगत असतो वर्षातून एकदा वीस दिवस सुट्टी घ्या. पालखीबरोबर चालत जा. सबंध वर्षाचे आरोग्य या पंधरा दिवसांत मिळवा!

पुष्कळांना शंका येतात. एवढे चालता येईल का? मग माझ्या एका परिचित जोडप्याने केलेली युक्ति मी त्यांना सांगतो. पालखी येण्याआधी दोन महिने या जोडप्याने रोजचे हिंडणे वाढवून लांब लांब चालण्याचा सराव केला. या शंकेबरोबर दुसऱ्याही शंका येतात. सामानाचे काय? जेवणाचे काय? उतरण्याचे काय? मी या सर्व शंका निरसन करतो.

पालखीबरोबर चालत जाणे हे बहुतेक शहरी सुशिक्षितांना, भोळसट, वेडेपणाचे आणि निरुद्योगाचे वाटते. त्यांच्यासाठीच मी पालखीबरोबर जाण्याचीही शास्त्रीय कारणे सांगितली. कारण हल्ली काही लोकांना सर्व गोष्टींत शास्त्रीय कारणे कळावी लागतात. भूक लागते म्हणून जेवायचे असते हे जेवण घेण्याचे सरळ कारण त्यांना पटणार नाही. जठरात पित्तरसाचा प्रकोप होतो तो शांत करण्यासाठी अन्न घ्यावयाचे असते असे म्हटले की त्यांना पटते. पालखीबरोबर येणाऱ्या सुशिक्षितांची संख्या दोन-अडीचशे असते. इतर हजारो लोक श्रद्धेने पालखीबरोबर येत असता आणखी काही सुशिक्षित पालखीबरोबर यावे यासाठी मी श्रद्धेतर कारणे देऊन त्यांचा अनुनय करावा हे बरोबर नाही. यावयाचे असेल तर त्यांनी श्रद्धेनं यावे असेच मी म्हटले पाहिजे आणि मला लिहावयाचे असेल तर श्रद्धेने येणाऱ्या हजारोंविषयी मी लिहिले पाहिजे; पण मला ठाऊक आहे

माझ्या लिहिण्या– न लिहिण्याची त्या हजारोंना पर्वा नाही. पाऊस असो– नसो ते येतातच. पेरणी होवो– न होवो ते येतात. आजारी असले तरी येतात. पैसे नसले तरी येतात. घरी कसलीही अडचण असो ते येतात. एकदा पंढरपुराकडे तोंड केले की मागे वळत नाहीत ! पानशेत झाले तेव्हा मी त्यांचा अनुभव घेतला.

आज चाळीसएक पालख्या महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या गावांपासून पंढरपुराकडे जाण्यासाठी निघतात. पालखी दिंड्यांची झालेली असते व दिंडी ही काही वारकरी एकत्र येऊन होते. हे वारकरी एका गावचे असतात किंवा एका नेतृत्वाखालचे लोक असतात. दिंड्यांचा पालखीत उभे राहण्याचा क्रम ठरलेला असतो, तसेच वारकऱ्यांनी दिंडीत कुठे उभे रहावयाचे हेही ठरलेले असते. बाहेरून वाटते तशी पालखी बेशिस्त नसते. ती संकेताप्रमाणे चालते व संकेत मोडणे हे अशिष्ट असते. पालखी चालतेसुद्धा शिस्तीत. प्रथम तीन माणसे एका रांगेत चालतात, गर्दी वाढू लागली की ती चार होतात, पाच होतात, पुढे पंचवीसएक हजार लोक होतात तेव्हा ही रांग सात-आठची होते. पालखीमुळे रस्त्यावरची रहदारी थांबली असे होत नाही. बाजूने एस. टी वगैरे गाड्यांसाठी निर्वेध जागा ठेवलेली असते. पालखीचे एक विश्वस्त बाळ पंडित यांनी मला सांगितले की, पालखीची ही शिस्त प्रस्थानापासून सुरू होते.

हे प्रस्थान पहाण्यासाठी त्यांनी आम्हाला यंदा मुद्दाम नेले होते. प्रस्थानाचे वेळी सर्व दिंडीप्रमुखांचा सन्मान केला जातो. सन्मानाचा हा नारळ घेणाऱ्यांत तीन स्त्रिया होत्या. तसेच अस्पृश्यांच्या दिंड्यांचेही प्रमुख होते. या वेळी भालदार, चोपदार, देवळातील सेवेकरी वगैरेंच्या उभे राहण्याच्या जागासुद्धा ठरलेल्या आहेत. सन्मान घ्यायला येण्याचा क्रमही ठरलेला आहे. हे सर्व काटेकोरपणे पाळले जाते. पंडितांनी आम्हालाही मानाचा नारळ दिल्यामुळे आम्ही प्रसन्न झालो. अस्पृश्यांच्या दिंडीच्या स्थानाबद्दल गेले वर्षी थोडी गडबड झाली. यंदा कोर्टाचा निकाल लागेपर्यंत अस्पृश्यांना हवी होती तशी व्यवस्था ठेवली, प्रस्थान शांतपणे पार पडले.

पालखी वरून गबाळी वाटली तरी दीडशे वर्षे ती चालू आहे. दीडशे वर्षे टिकून राहण्याइतकी शिस्त. श्रद्धा व पद्धत तिच्याजवळ आहे. त्याच गुणावर ती पुढेही टिकेल. अस्पृश्यांच्या गाऱ्हाण्याबाबत तिने हट्ट मागे घेतला; पण तशी ती फार हट्टी व चिवट आहे, तिचा ठरलेला मार्ग व उतरण्याच्या जागा ती बदलत नाही. बहुधा गावाबाहेर माळरानावर ती उतरते. कुणालाही दर्शनाला येण्यास निर्वेध वाटेल अशी ती जागा असते. फलटणच्या राणीसाहेबांनी फलटणात ज्ञानेश्वरांचे सुंदर मंदिर बांधले. या मंदिरात पालखी उतरावी अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली, त्यांनी पालखीची उतरण्याची, राहण्याची, जेवणाची सर्व व्यवस्था अंगावर घेतली तरी वारकरी नेहमीच्या जागेवरच उतरण्यास गेले.

◻

आम्ही प्रस्थानाला गेलो हे वाचल्यावर कुणीही विचारील की प्रस्थानाचे वेळी कळस हलतो हे खरे का ? पादुका पालखीत ठेवल्यानंतर आम्ही माडीवर जाऊन सोहळा पाहात बसलो. कळस अगदी आमच्या समोर होता. पालखी देवळातून बाहेर येऊन देऊळवाड्यात प्रदक्षिणा घालू लागली तेव्हापासूनच्या अर्ध्या तासात कळस चार वेळा हलला. पालखीचा भयंकर गदारोळ चालू असता एकदम सर्व शांत झाले. सर्व जण स्तब्ध होऊन कळसाकडे पहात होते. काही क्षणात कळस हलला आणि कल्लोळ उसळला! ज्ञानोबामाऊली–तुकारामांच्या गर्जना झाल्या.

आम्ही बाळ पंडित यांना आतून दोरी लावून कुणी कळस हलवतो का थट्टेने विचारले. ते म्हणाले, "नाही आम्ही काही करीत नाही तुम्ही जाऊन पहा !' त्यांच्या मते कळस लावतानाच असा लावला गेला आहे की प्रदक्षिणेवेळच्या गदारोळाने निर्माण होणाऱ्या कंपनांनी तो हलतो; परंतु त्यांच्या सांगण्याने समाधान होणारे नव्हते. कारण गदारोळ आधीही तासभर चालू होता; पण तेव्हा कळस हलत नव्हता हे नक्की व पालखी बाहेर गेल्यावरही हलत नव्हता.

प्रदक्षिणेच्या वेळी आणि कळस हलतो तेव्हा वारकरी अक्षरशः वेडे होतात. जयजयकार आकाशात चढतात. टाळमृदुंग घुमू लागतात, भजनांचा सूर वाढतो. मग कुठे फुगड्या सुरू होतात, कमरेत वाकवाकून किंवा गिरक्या घेत, उड्या घेत दिंड्या भजने करू लागतात. प्रदक्षिणा करीत असलेली पालखी झंजावातात सापडल्यासारखी होते. तिला आवरता आवरता, तिला मागे-पुढे उचलून नेत असलेले दहादहा लोक घामाघूम होतात तरी ती आवरत नाही !

पालखीचे पूर्वीचे एक विश्वस्त व सरपंच कै. ह. भ. प. नेऊरगावकर यांनी लिहिलेल्या 'पालखीसोहळा' या पुस्तकात कळस हलण्याचा प्रकार दिलेला नाही. यावरून त्यावर पंचांपैकी कुणाची श्रद्धा नाही हे जे बाळ पंडित म्हणाले ते बरोबर दिसते. कळस हलणे किंवा वाटेतील घोड्याची रिंगणे असले प्रकार श्रद्धावन्त वारकरी उथळ, क्षुल्लक समजतो. त्याला चमत्कार मान्य नसतात. त्याचे लक्ष पंढरपुराकडे असते व विठ्ठलाचा गजर करीत तो वाटचाल करीत असतो. विठ्ठल हा भक्तीने मिळतो. चमत्काराने नाही ही त्याची श्रद्धा असते.

◻

ज्ञानेश्वरांच्या पालखीबद्दल मी एवढे लिहिले. आता जर ज्ञानेश्वरांबद्दल काही लिहिले नाही तर हे भरताड ठरेल; पण ज्ञानेश्वरांबद्दल मी काय लिहिणार ? त्यांनी जे जे लिहिले त्याचा मी भोक्ता आहे. अर्थात त्यांतले बरेचसे मला कळत नाही. उदाहरणार्थ, अमृतानुभव. त्यांच्या ज्ञानेश्वरीपेक्षाही त्यांचे स्फुट अभंग मला आवडतात. त्या अभंगांतील चपखल शब्दयोजना, कल्पनेच्या भराऱ्या, खोल अनुभूती, मार्दव आणि गोडवा याला मराठी वाङ्मयात तोड नाही! कित्येकदा मला असे वाटत की, आठशे वर्षांपूर्वी हा कवी–संत होऊन गेला. पुढच्या आठशे वर्षांत आम्ही केले काय ? त्याचा पल्ला एकालाही गाठता येऊ नये !

ज्ञानेश्वरांबद्दल मला याहून काही सांगता येणार नाही म्हणून विनोबांनी त्यांच्याबद्दल जे म्हटलंय तेच सांगतो. 'ज्ञानदेवांची भजने' या पुस्तकात त्यांनी 'ज्ञानदेवांचे स्मरण' म्हणून एक लेख लिहिला आहे. त्यात ज्ञानेश्वरांची ते एकेका थोर पुरुषाशी तुलना करीत गेले आहेत. ते लिहितात, 'ज्ञानेश्वरांशी तुलनीय असा हजारबाराशे वर्षांत एकच पुरुष–शंकराचार्य; पण ज्ञानदेवांजवळ सौम्यतेचा ओलावा आहे तो शंकराचार्यांत नाही. म्हणून ज्ञानेश्वर

'माउली' ठरले व शंकराचार्य 'आचार्य' राहिले. गोरखनाथांशी बघता गोरखनाथांचा गूढवाद त्यांनी ठेवला नाही. त्यांच्या योगाचा भक्तीपुढे साष्टांग नमस्कार आहे. गोरखनाथ शून्यवादी तर ज्ञानेश्वर पूर्णवादी. गोरखनाथांचा पंथ गुपित राहिला तर ज्ञानदेवांनी सगळा समाज आत्मसात केला. त्यांनीच म्हटले आहे.

इवलेसे रोप लावियले द्वारी
त्याचा वेलु गेला गगनावेरी ॥

तुकारामांशी तुलना पाहता तुकारामांची भक्ती ही गंगेसारखी आहे. पावसाळ्यात पिंगट, हिवाळ्यात शुभ्र आणि चढउताराची. अशाच भक्तीची ज्ञानेश्वरांनी शिफारस केली आहे; पण ज्ञानदेवांची स्वतःची भक्ति आकाशगंगेसारखी आहे. तिला चढउतार नाही. खळबळ नाही. खोली आहे. सहजावस्था आहे. त्यांच्या अभंगांतून तळमळ काही थोड्या जागीच आढळते.

ज्ञानदेवांची मुख्य प्रेरणा धर्मसंस्थापनेची आहे. ज्ञानेश्वरी हा एक सांगोपांग धर्मग्रंथ आहे. धर्माच्या नावावर वेडगळ समजुतींना किंवा संकुचित कल्पनांना त्यात थारा नाही हे त्यातले विशेष; पण ज्ञानदेवांचा सर्वांत मोठा गुण मार्दव, विनयशीलता, अहिंसा! या बाबतीत त्यांची तुलना कोणाशी करावी कळत नाही. सॉक्रेटिसमध्ये क्षमा, शांति व अहिंसा होती; पण तो दुसऱ्यांना बोचणारा विनोद करू शकत होता. येशू ख्रिस्त दयेची मूर्तीच; पण 'हे ढोंग्यानो! तुम्हाला हाय हाय!' अशी शापवचने तो उच्चारतो तेव्हा तो समत्वबुद्धि मागे सारतो. तुकारामांना 'तुका म्हणे जे जे भेटे। ते ते वाटे मी ऐसे।' एवढे दर्शन झाले होते; पण 'तुका म्हणे माझे खवळले तोंड' ही त्यांची सवय सुटत नाही. गांधीजींचा अहिंसेविषयीचा आग्रह प्रसिद्धच आहे आणि राजकारणाचा व्यवहार त्यांनी सतत संभाळला ही एक उपाधी. त्या उपाधीचा विचार करता निःसंशय वा वाङ्मयाचा जो आदर्श त्यांनी प्रगट केला तो निरुपमच आहे. तरी निरुपाधिक विचार करता त्यांच्याही वाणीला कठोरतेचा स्पर्श झालेला दिसेल. गांधींचा गुरू टॉल्स्टाय तो तर चवताळून अहिंसेचा बचाव करितो. ज्ञानदेवांच्या वाणीत कुठेही कटुतेचा लेश आढळत नाही. जगाने त्यांचा जो छळ केला त्याचा कुठे उल्लेखही नाही!

मला वाटते, विनोबांनी जे हे लिहिले आहे त्यात ज्ञानेश्वरांविषयी जे सांगावयाचे ते सर्व आले आहे. त्यातली ज्ञानेश्वरांची इतर संतांशी तुलना करण्याची कल्पना मला काहीशी खटकली. तरी त्या निमित्ताने ज्ञानेश्वरांची जी महती मांडली तेवढी स्वीकारावी. सगळा ज्ञानेश्वर आपणास वाचणे शक्य नाही. तेव्हा हे अमृत समजावे.

□

आज शेकडो वर्षे पंढरपुरास वारीस जाणे चालू आहे व पुढेही चालू राहील. आगगाडी, मोटार यांच्या सोई बाजूला सारून हजारो लोक पायी जातील. हा सर्व परिणाम ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या संतांनी आपल्या अप्रतिम, उत्कट काव्याने निर्माण केलेला परिणाम आहे. या संतांनी एकाहून एक सरस अभंगांनी पंढरपूरची, विठ्ठलाची एक विलक्षण प्रतिमा लोकांच्या हृदयावर कोरली. पंढरपुरास जाताना किंवा गेल्यावर तेथे इतर काहीही दिसो ते त्याला दिसत नाही. अभंगातून उत्पन्न केलेल्या प्रतिमाच त्याला दिसतात. संतांनी रसपूर्ण काव्याने पंढरपूरची वारी महाराष्ट्रात भिनवली. प्रथम ज्ञानेश्वरांनी सांगितले,

उठी बाळा! जाय वेगी तीर्थे रे हिंड।
तेथ भेटती साधुसंत उदंड ॥

अर्थात ज्ञानेश्वरांना तीर्थ म्हणजे एकच–पंढरी. पंढरीत काय आहे सांगताना जनी म्हणते,

तेथे देव असे उभा।
कैसी समचरणाची शोभा ॥

निळोबा पंढरीचे फारच महात्म्य सांगतात,

आधी रचली पंढरी।
मग वैकुंठनगरी ॥

तुकोबा मोठ्या अभिमानाने विचारतात,

ऐसी चंद्रभागा–ऐसा भीमातीर।
ऐसा विटेवर–देव कोठे? ॥

पंढरपुरी गेल्यावर काय काय करायचे हेही निळोबांनी सांगितले आहे,

करुनी चंद्रभागे स्नान ॥
आधी वंदन पुंडरीका ॥
पुढे जाती विठोबाशी।
वैकुंठवासी ते होती ॥
कथाश्रवण प्रदक्षिणा।
नाही गणना सुकृता त्या ॥

पंढरपुरातले त्या वेळचे वातावरण ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांनी हृद्य असे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात,

या हरिदासासी वाळवंटु।
जागरणासी दिधले ॥

चोखामेळा सांगतात,

चंद्रभागा वाळुवंट।
संत घनदाट नाचती ॥

पंढरपुराची वाटचाल करताना मनाची काय अवस्था होते ती संतांनी दिली आहे,

॥ तुका म्हणे केव्हा देखेन कळस ॥

पंढरपुरातील त्या वेळचे रस्ते वर्णन करताना प्रत्येक संताच्या शब्दांनी फुलोरा घेतलेला आहे,

चालती स्थिर स्थिर ॥
गरुडटकयांचे भार ॥
गर्जती गंभीर–टाळ श्रुति मृदुंग ॥
मिळालिया भद्रजाती ॥
कशा आनंदे डुल्लती ॥

चंद्रभागेत स्नान करून देवळात येताच ज्ञानेश्वर म्हणतात,

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ॥
तेणे मुक्ति चारी साधीयेल्या ॥

मग पांडुरंगापुढे उभे राहिल्यावर भान हरपलेले तुकाराम म्हणतात,

तुज पाहता सामोरी।
दृष्टी न फिरे माघारी ॥
माझे चित्त तुझ्या पाया।
मिठी पडली पंढरीराया ॥

ज्ञानेश्वर म्हणतात,

रूप पाहता लोचनी।
सुख झाले वो साजणी ॥

दर्शनानंतर पुन्हा वाळवंटी येऊन भजनकीर्तन होते. तुकाराम त्याबद्दल म्हणतात,

कथेची सामग्री–देहअवसानावरी ॥
नको जाऊ देऊ भंगा-गात्रे माझी पांडुरंगा ॥

अशा कीर्तनाच्या मस्तीत पंढरपूर सोडण्याची वेळ येते आणि संत थबकतात, त्यांचे डोळे पाण्यांनी भरतात,

कन्या सासुरासी जाये।
मागे परतोनि पाहे ॥

अशा विकल अवस्थेत ते पंढरपूर सोडतात.

ज्ञानेश्वरांच्या पालखीच्या निमित्ताने मी हा सर्व संसार मांडला. ज्ञानेश्वरांच्या पादुका पुण्यात आल्या त्याचे एका लेखकाने शब्दांचा हार घालून केलेले हे स्वागत समजावे. लेखकाने करावे तेच केले आहे. □

बिंदूकथा

# वीकएण्ड

बिंदुसार

बाल्कनीत उभे राहिले की, खूप मोठा आसमंत दिसतो. घरासमोरचा रस्ता जवळजवळ फर्लांगभर नजरेत भरतो. डावीकडून सरळ आलेला रस्ता उजवीकडे वळण घेत, मोठ्या रस्त्याला मिळतो. गुलमोहोराची लालभडक झाडे मंदपणे डुलत असतात. झाडांच्या गर्दीमधून कौलारू बैठी घरे सुस्तपणे व्यवहार करताना दिसतात. पलीकडे एक भव्य देवालय आणि त्याच्याही पलीकडे निळसर धूसर टेकड्या. मधूनच एखादे विमान घरघरत जाते. पिंपळाच्या मोठ्या झाडावरून पक्ष्यांचा थवा निर्हेतुकपणे तलम निळ्या आकाशात झेप घेतो.

तो बाल्कनीत उभा आहे. नुकतेच स्नान झालेले. केसांचा ओलसरपणा, साबणाचा रेंगाळणारा लिबासारखा वास, अंगावरच्या परीटघडी झब्बा-पायजम्याचा सूक्ष्म, चुरचुरीत गंध. या साऱ्याने चित्तवृत्ती तरल बनल्या आहेत. सैल, हलक्या अशा मूडमध्ये नेहमीप्रमाणे तो समोर बघत उभा आहे. खरे तर त्याची नजर खास काही बघत नाही आहे. सरत चाललेल्या उन्हाची विरळ धग आणि संध्याकाळच्या वाऱ्याची तुरळक झुळुक यांचे अनिश्चित मिश्रण त्याच्या रित्या मनाची अवस्था अधिकच अनिवर्चनीय करीत आहे. देवालयाच्या कळसामागे मावळत्या सूर्याने उधळलेले लालसोनेरी रंग आकाश व्यापून टाकीत आहेत.

आज वीकएण्ड! इतर दिवसांप्रमाणेच शनिवार-रविवारचा कार्यक्रमही बराचसा ठरलेला; पण त्यातील ठरीवपणा जाणीबपूर्वक डोळ्यांआड करायचा! नेहमीप्रमाणे आजही वीकएण्डच्या अपेक्षेने शरीर व मन सौम्य उत्कंठेने काठोकाठ भरले आहे. समोरच्या विशाल, धूसर पण रंगांनी परिपूर्ण अशा दृश्याने मनाला एक लय सापडली आहे. समुद्राकडे एकटक पाहताना वाटते तसे व्यापलेपण जाणवत आहे.

तो सिगारेट पेटवतो. डावी-उजवीकडे पाहात धुराचा एका गोल हवेत सोडतो. डावीकडच्या एका दृश्याने, इतका वेळ अलगद असलेली, कशातच न गुंतलेली त्याची आळशी नजर जरा अटकते.

एक माणूस आणि दोन मुले येत आहेत. डाव्या बाजूला रस्त्यावर, सुमारे शभर फुटांवर त्या तीन आकृत्या आहेत. फार संथ, जवळजवळ स्थिर अशा त्या आकृत्या. नेहमीचेच दृश्य म्हणून तो आपली नजर त्या दृश्यावरून सोडवून घेतो. एक खोल झुरका घेऊन सभोवार दृष्टिक्षेप टाकतो.

पण त्या दृश्यातील वेगळेपण त्याच्या डोळ्यांनी नकळत टिपले आहे. पुन्हा नजर तिकडे वळते.

तिघे जरा जवळ आले आहेत. एक मुलगा दहा वर्षांचा. अंगात मळके फाटके कपडे, पायात काही नाही.

दुसरा सहा-सात वर्षांचा. गुडघ्याच्या जरा वर असा ढगळ सदरा. बहुधा मोठ्या भावाचा. विजार नाही. हाही अनवाणीच.

या दोघा मुलांनी, त्या माणसाचा एक एक हात गच्च पकडून ठेवला आहे. इतका गच्च की, इतक्या वर बाल्कनीतूनही त्यांची पकड किती घट्ट आहे ते जाणवत आहे. दोघांच्याही मुद्रांवर प्रचंड, जीवघेण्या जबाबदारीचे ओझे स्पष्ट दिसत आहे.

तो माणूस बेफाम प्यालेला आहे. इतका की, त्याच्याने उभेही राहवत नाही. मध्येच तो बसकण मारतो. मुले त्याला दोन्ही हात वर ओढून उठवतात. त्याचे डोके एकदा पुढे छातीवर झुकत आहे—एकदा खूप मागे, अर्धवट लोंबत आहे.

पुढे, मागे, डावीकडे, उजवीकडे झुकणारे त्याचे काटकोळे शरीर, कसे तरी उभे ठेवून ती मुले एक एक पाऊल त्याला चालवीत आहेत. तो थांबला की तीही थांबतात. शांतपणे! एकमेकांशी चकार शब्द न बोलता. तो माणूस पुढे निघाला की, ती पुढे पाऊल टाकतात.

हळूहळू ते तिघे बाल्कनीच्या अगदी खाली येतात. तो माणूस उलटीकडे तोंड वळवून काही तरी न्याहाळू लागतो. त्याबरोबर ती मुलेही गोल फिरतात. त्याच्या हातावरील पकड ढिली झालेली नाही. चेहऱ्यांवरची अगतिकता वाढते.

हातातल्या सिगारेटचा चटका बसतो आणि बाल्कनीत तो भानावर येतो. डोळ्यांसमोरच्या दृश्यातला निःशब्द, असह्य ताण शब्दापलीकडला आहे. एका संदिग्ध शरमेने, धिक्काराने त्याचे मन व्यापून जाते.

रस्त्यावरच्या माणसाने आता मोहरा फिरवला आहे. मूळच्या दिशेला तोंड वळवून तो वाढत्या झोकांड्या खात आहे. त्याला स्थिर राखण्याचा ताण मुलांना जाणवू लागला आहे; पण ती तसेच त्याला एक एक पाऊल चालवीत आहेत. डोळे मिटलेल्या, कंगाल कपड्यातील त्या बेशुद्धीच्या सीमेवरील माणसाला आपली असहाय अवस्था खोल कोठे तरी जाणवत असावी. त्याच्या सर्व हालचाली आपोआप होत आहेत. मुलांच्या हातांची पकड सोडविण्याचा तो एकदाही प्रयत्न करीत नाही. तोंडावाटे एक शब्दही उच्चारीत नाही.

डोलकाठीप्रमाणे डुलणारा तो माणूस, त्याच्या बाजूची ती दोन मुले, हळूहळू वळणापलीकडे अदृश्य होतात.

एक अनाकलनीय सुस्कारा सोडीत तो बाल्कनीमधून दिवाणखान्यात येतो.

अंधार वाढत आहे. शहरचे दिवे पेटत आहेत.

तो भराभर आवरतो. बाहेरचे कपडे करतो. पत्नीही तयार झालेली आहेच. आता थोडेफार भटकणे—कदाचित शॉपिंग! कोणी वाटेत भेटल्यास हास्यविनोद! गमतीदार कुचाळक्या! वीकएण्ड रंगू लागला आहे.

दोघे बाहेर पडतात. शहरच्या वर्दळीवर लहरत, विहरत, बहरत खूप वेळ काढतात. घरी परतताना तो वाटेत स्कूटर थांबवतो. पत्नीला याचा सराव आहे. ती उतरून साडी सारखी करीत रस्त्यावरची रहदारी पाहू लागते. एक ओळखीची स्त्री भेटताच त्याच्या गप्पा सुरू होतात.

'अय्या, ही साडी कधी घेतलीत?'

'इश्श, ही गेल्या दिवाळीतली!'

तो वाइनशॉपमध्ये शिरतो. दुकानदाराला त्याचा ब्रँड माहीत आहे. बाटली पॅक होत असताना दुकानात एक दहा-बारा वर्षांची मुलगी येते.

'क्वार्टर हेवर्ड मागीतलीय बाबांनी!' ती पैसे कौंटरवर ठेवते. दुकानदार हसून तिला सांगतो.

'अजून आठ आणे हवेत बेबी!' हेलपाटा पडणार म्हणून त्रासून ती मुलगी परत फिरते.

रात्र झाली आहे. अंधार गडद वाढला आहे. तो बाल्कनीत बसला आहे समोरच्या टीपॉयवर पाय ठेवून. बाजूच्या बैठ्या टेबलावर बर्फ, सोडा, वेफर्स असा सारा सरंजाम आहे.

तो विचारपूर्वक ग्लासमध्ये ड्रिंक ओततो. सोडा, बर्फ घालून सारखे करतो. पहिला घोट घेऊन समाधानाने मागे मान टेकतो! □

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# कोलंबो : विरत जाणारे धुके

जूनच्या पूर्वार्धामध्ये अलिप्त राष्ट्रे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका दिशाहीन राष्ट्रसमुदायाची कोलंबोमध्ये बैठक झाली. कोणताही निर्णय घेताना अलिप्त राष्ट्रांना आपल्याकडे ताकद नाही याची सतत जाणीव होत असते. जगाचे आर्थिक संतुलन ठरवणारे अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, जपान, कॅनडा वगैरे संपन्न देश आणि लष्करी संतुलन बिघडवू पहाणारे अमेरिका, रशिया व चीनसारखे देश हे अप्रत्यक्षपणे अलिप्तांच्या परिषदांना त्यामुळेच हजर असतात.

जवाहरलाल नेहरू, इजिप्तचा तत्कालीन अध्यक्ष नासर आणि युगोस्लावियाचे तह-हयात अध्यक्ष मार्शल टिटो यांनी पुढाकार घेऊन ही तथाकथित चळवळ स्थापन केली. तिचा उद्देश रशिया व अमेरिकेच्या प्रभाव-क्षेत्राखालील जगातील जास्तीत जास्त देश स्वावलंबी करावेत, किमानपक्षी बड्या राष्ट्रांचा त्यांच्या धोरणांवर आणि स्वातं-त्र्यावर होणारा अनिष्ट परिणाम शक्यतो कमी करावा असा होता; पण कोणत्याही संस्थेची अगर चळवळीची उद्दिष्टे नेहमीच उदात्त असतात. प्रत्यक्षात काय येते ते महत्त्वाचे.

नेहरूंना त्या वेळी पंचशीलची चटक लागलेली होती. त्यांचे पाय जमिनीवर आणणारा चीनचा हल्ला तेव्हा झालेला नव्हता. त्यांच्या अनेक कृतिशून्य स्वप्नां-प्रमाणे हीही एक कल्पनेची घोडदौड होती. नासरच्या बुद्धिमत्तेबद्दल मला नेहमीच शंका वाटत आलेली आहे. टिटो रशियाच्या विळख्यातून युगोस्लाव्हिया कसा सोडवावा या चिंतेत होते. त्यामुळे न झेपणारी ध्येये डोळ्यांपुढे ठेवून ही चळवळ स्थापन झाली.

फुगत फुगत अलिप्तांची सदस्यसंख्या आज ८८ वर आलेली आहे. सदस्यसंख्या हे यशाचे गमक नव्हे. तसे पहाता युनोचे सदस्य नसलेले हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच देश आहेत; पण राजकीय वा लष्करी प्रवाह रोखू शकणारी ताकद या दृष्टीने युनोचे स्थान किती हे सर्वांस विदित आहेच. उलट जेवढी सदस्यसंख्या जास्त तेवढा भोंगळपणा, परस्परविरोधी दिशांना होणारी ओढाताण आणि त्यातून 'चळवळ' या शब्दातून प्रतीत होणारी गती व दिशा यांचे खच्चीकरण एवढेच संभवते आणि नेमके तेच या अलिप्त राष्ट्र-चळवळीचे झालेले आहे.

अंतर्गत लठ्ठालठ्ठीचे उदाहरणच घ्यायचे झाले तर इथिओपिआ आणि सोमाली किंवा व्हिएतनाम आणि काम्पुचिया [कंबोडिया] किंवा इजिप्त व इराक, सीरिया, लीबिया-सारखी जहाल अरब राष्ट्रे यांचे घता येईल. यातील प्रत्येक जोडीमध्ये आपसात वारंवार राजकीय तणावाचे प्रसंग येतात. इथिओपिया आणि सोमालीत किंवा व्हिएतनाम आणि काम्पुचियात तर रक्तपातच घडतो. मग यातले अलिप्त कोण ? शांततावादी पंचशील-वर विश्वास ठेवणारे कोण ?

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, गटनिरपे-क्षता हेही याचे लक्षण इतउत्तर मानता येणार नाही. सरळ सरळ रशियाचे वर्चस्व असणारा क्युबा, परवा परवाच रशियन पंखाखाली गेलेला अफगाणिस्तान किंवा चीनशी संबंध दुरावताच रशियाचा आश्रय घेणारा व्हिएतनाम हेही या संघटनेत सामील आहेत. त्यांना शह म्हणून लॅटिन अमेरिकेतले काही देश अमेरिकेच्या हितसंबंधांची जपणूक करत असतात. यामुळे अलिप्तता की बेबंद-शाही असा प्रश्न पडावा. कारण या साऱ्यांचा परिणाम जैसे थे परिस्थिती कायम राखण्यात होतो.

परवाच्या कोलंबो-परिषदेत हेच घडले. परिषदेच्या आधीपासूनच दोन प्रश्नांवर गदारोळ उठणार असा रंग दिसत होताच. पहिला प्रश्न इजिप्त-इस्राएल तहाचा. वस्तुतः हा तह द्विपक्षीय आहे. त्याअन्वये इजिप्त कोणा शीही लष्करीदृष्टया बांधील नाही. त्यामुळे अलिप्ततेच्या रूढ चौकटीत बसून शांततेसाठी केलेला करार अशी त्याची शास्त्रीय संभा-वना; परंतु जहाल अरबराष्ट्रांना प्रत्येक आंतरराष्ट्रीय परिषदेत इजिप्तवर धूळफेक करायची घाई झालेली आहे. इजिप्तशी आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय संबंध त्यांनी तोडून टाकलेले आहेतच. शिवाय जगाने त्याला एकटे पाडावे अशी त्यांची इच्छा त्यामुळे त्यांनी इजिप्तला या चळवळीतून हाकलूनच द्यावे अशी भूमिका आधीच जाहीर केली होती आणि ती तडीस नेणार असा निर्धारही व्यक्त केला होता. मुळात एखाद्या सदस्याला काढून टाकण्याची तरतूदच अलिप्त राष्ट्रचळवळीच्या घटनेत नाही. त्यामुळे मोरारजी देसाईंनी आधीच प्रत्युत्तर दिल्या-प्रमाणे असे करणे कठीण होते; पण या प्रश्नावरून संघटना फुटते की काय इतपत वातावरण तप्त झाले होते. इजिप्तच्या 'द्विपक्षीय करार' या भूमिकेला अरब-राष्ट्रांचा आक्षेप होता. पॅलेस्टाइनचा प्रश्न बुद्धिपुरस्सर उपेक्षिला जातो असे त्यांचे मत होते आणि जगाला पॅलेस्टाइनचा विसर पडेल म्हणून तरी इजिप्तला शिक्षा व्हायला पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. त्यात इजिप्त संस्थापकांपैकी एक, त्यामुळे प्रकार अधिकच क्लिष्ट झाला.

मग भारत, युगोस्लावियासारखे मध्यम-मार्गी देश पुढे आले. त्यांनी प्रश्न सोडवणे दूरच (कारण तो सोडवणं त्यांच्या आवाक्या-बाहेरचेच होते.) तो पुढे मात्र ढकलला. म्हणजे तो अधिक चिघळल तेव्हा पाहू अशी भूमिकाच पर्यायाने घेतली. या घटकेला अडचण नको हे ठीक; पण आजच्या काट्याचा उद्या नायटा होणार त्याचे काय ? तेव्हा तरी काय उत्तर देणार ? पुढची बैठक हवाना या क्युबाच्या राजधानीमध्ये सप्टेंबर-मध्ये होणार आहे तेव्हा हा प्रश्न चर्चेला काढावा असे ठरले. म्हणजे जेथे मुत्सद्दी-पणाची खरी कसोटी लागेल असे दिसले तथे यांनी बचावात्मक धोरण घेतले. आधीच बड्या राष्ट्रांना यांच्याबद्दल आस्था नाही. (अलिप्त राष्ट्रांपैकी बहुसंख्य राष्ट्रे हा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत बड्या राष्ट्रांच्या वसाहती होत्या, त्यात यांची

निर्णयक्षमता बेताची.

अलिप्त राष्ट्रांच्या दृष्टीने एकच महत्त्वाची गोष्ट करता येण्यासारखी आहे. ती म्हणजे तिसऱ्या जगाचे अन्तर्गत आर्थिक व व्यापारी संबंध वाढवणे. कारण भारतासारखे तंत्रज्ञान पुरवू शकणारे देश आणि कच्च्या मालाची सदस्यदेशातील विपुलता लक्षात घेता बड्या राष्ट्रांच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी एवढी एकच गोष्ट अत्यंत हिरीरीने करण्यासारखी आहे. जोपर्यंत ही राष्ट्रे स्वावलंबी बनत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या ठरावांना आणि सूचनांना जागतिक रस्सीखेचीत किंमत नाही.

फिलिपाइन्समध्ये परवाच झालेल्या अँक्ट 15 UNCTAD च्या बैठकीत भारताने तिसऱ्या जगाच्या अंतर्गत व्यापारात ५०% करसवलत सरसकट लागू करावी अशी सूचना मांडली होती. ती सूचना असा व्यापार फोफावण्यासाठी उपयोगीही आहे. हे केवळ एक उदाहरण म्हणून दिले. वस्तुतः अशा योजनांवर जास्तीत जास्त भर देऊन त्या अंमलात कशा येतील हे पहाणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात कोलंबोच्या समन्वयसमितीच्या बैठकीत काय घडले ?

दादापुता करून इजिप्त व जहाल अरब दोघांनाही कसेबसे थोपवण्यात आले. दुसरा प्रश्न होता काम्पुचियाचा. विएतनामने काम्पुचियावर आक्रमण करून तेथील पोलपोत राजवट उलथली. त्या जागी स्वतःला अनुकूल असे हांगसमरिन याच्या नेतृत्वाखालील सरकार आणले. चीनने विएतनामला 'धडा शिकवण्यासाठी' त्याच्यावर हल्ला केला आणि बरीच नुकसानी केली. तसेच चीनने काम्पुचियातही सैन्य घुसवून पोलपोतला पुनश्च सत्तारूढ करण्यासाठी छुपे प्रयत्न चालू ठेवले आहेत.

वाजपेयींच्या चीनभेटीच्या दरम्यानच चीनने विएतनामवर हल्ला केलेला होता आणि विएतनामने पोलपोत राजवट उखडून नवीन सरकार अस्तित्वात आल्याचे जाहीर करूनही केवळ चीनभेटीवर अनिष्ट परिणाम होईल म्हणून काम्पुचियाला आपण मान्यता दिली नाही. या कोलंबो परिषदेपुढे खरा काम्पुचिया कोणता असा प्रश्न उभा राहिला. कारण पोलपोत राजवटीतर्फे एक प्रतिनिधिमंडळ हजर झाले आणि हॉंगसमरिनतर्फे दुसरे.

अजूनही काम्पुचियात राजकीय अस्थैर्य असल्याने परिस्थिती फारच नाजूक होती. त्यात विएतनाम-अफगाणिस्तान-क्युबा यांनी हॉंगसमरिन राजवटीलाच काम्पुचियाची खरी प्रतिनिधी म्हणून मान्यता द्यावी असा आग्रह धरला. कारण रशियाच्या पाठिंब्यावरच विएतनामने राजवट उलथण्याचे उद्योग केलेले होते.

परंतु समन्वयसमितीच्या सुदैवाने या तीनही राष्ट्रांनी (विएतनाम–अफगाणिस्तान आणि क्युबा) या करारावर अडेलतट्टूपणाची भूमिका न घेतल्याने त्याच्याकडे सर्वांना डोळेझाक करणे सोयीचे गेले.

या तीन राष्ट्रांनीही थोडक्यातच का समाधान मानले हे पहाणे मनोरंजक आहे. विएतनामला चीनशी चालू असलेल्या वाटाघाटी बिघडू द्यायच्या नाहीत, अफगाणिस्तानला जास्त काळजी पाकिस्तानी घुसखोरांची आणि तो प्रश्न समन्वयसमितीपुढे आणण्याची होती, तर क्युबा येत्या सप्टेंबरमध्ये होणाऱ्या परिषदेचा 'होस्ट' असल्याने त्याला वातावरण फारसे बिघडू द्यायचे नाही.

क्युबातली आगामी बैठकही गाजणार असे दिसते. कारण जे प्रमुख दोन प्रश्न कोलंबोला तडीला लागतील असे वाटले होते, ते क्युबात आहेतच. शिवाय क्युबा रशियाच्या हातातले बाहुले असल्याने तेथे परिषद भरवणे पहिल्यापासून वादग्रस्त ठरलेले आहे.

इथिओपिया–सोमाली युद्धात रशियातर्फे क्युबानेच सोमालीला मार दिल्याची सोमालीची आठवण ताजी आहे. जेव्हा बैठक हवानात होणार असे बेलग्रेडला (मागच्या बैठकीची जागा) जाहीर झाले तेव्हाच सोमालीसारख्या बऱ्याच देशांनी निषेध नोंदवला, तेव्हाच इजिप्तनेही आपण हवाना बैठकीला हजर रहाणार नाही असे स्पष्ट जाहीर केले.

आधी क्युबाच्या अलिप्ततानिष्ठेबद्दल सगळे साशंक, त्यात याच अधिवेशनात क्युबा आणि अफगाणिस्तानने एक खोडसाळ ठराव मांडला होता. 'सर्व समाजवादी (म्हणजे कम्युनिस्ट) राष्ट्रेही अलिप्त राष्ट्रांची अगदी जवळची मित्रराष्ट्रे आहेत आणि कायम रहातील' असे धोरणात नमूद करण्यासाठी हा ठराव होता. म्हणजे दुसऱ्या शब्दात रशियाच्या कुरणात सगळी मेंढरे एकदम ढकलण्याचा हा प्रयत्न होता.

उपरिनिर्दिष्ट कारणानेच क्युबाने याही ठरावावर फारसा भर दिला नाही; पण यावरून त्याच्या विचारांची दिशा स्पष्ट व्हावी.

पाकिस्तान आणि इराण या संघटनेत येऊ इच्छितात. सध्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तानाचे संबंध रसातळाला पोचले आहेत, पाकिस्तान सीमेवरून घुसखोर पाठवत आहे. राजकीय अस्थैर्य वाढवत आहे, सीमेवरच्या मागास जमातींना शस्त्रे देऊन काबूलमधील राजवटीबद्दल असंतोष निर्माण करत आहे इत्यादी तक्रारी अफगाणिस्तानच्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या सदस्य होण्याला अफगाणिस्तानचा विरोध आहे. इराणबद्दल फारसा प्रश्न न यावा. या दोघांचेही सदस्यत्व ठरवणे हवानाच्या अजेंड्यावर आहे.

एकूण पहाता, नक्की यांनी कोलंबोला केले काय ? याचे उत्तर काहीही नाही हेच होय. निर्णयाची चालढकल व सगळ्यांना संतुष्ट राखण्यासाठी काही न करणे हे अलिप्त राष्ट्रचळवळीच्या यशाचे द्योतक असल्यास प्रश्नच नाही.

हवानाची बैठकही निश्चित निर्णय घेईल असे दिसत नाहीच.

□

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## मंत्रीमोशाय, डोकं लढवा !

सध्या लग्नांचा सीझन आहे. नवपरिणित जोडपी दरवर्षी हनीमून साजरा करायला दार्जिलिंगला जात असतात तशी याही वर्षी जाऊ लागली आहेत आणि नेमकी ह्याच वेळी आमच्या. मोरारजीभाईंनाही दार्जिलिंगला जायची अवदसा आठवली. आता ते काही निराळ्या कामासाठी गेले असतील, त्यांनीही दार्जिलिंगला जरूर जावं. तिथल्या बर्फाळ वातावरणात हिंडून ताजंतवानं होऊन यावं; पण झालं काय, पंतप्रधान आपल्या गावी आले म्हटल्यावर तिथल्या स्थानिक लोकांची सांस्कृतिक अस्मिता खडबडून जागी झाली. आयतेच पंतप्रधान चालून आल्यावर मागण्या पुढे न करील तर तो भारतीयच नव्हे ! झाल्लं. नवी जोडपी, जुनी जोडपी, तरुण पोरांचे घोळके, एकाकी माणसं, ह्या सर्वांच्या तैनातीत राहायचं सोडून सर्व नेपाळी एकत्र एके ठिकाणी जमा झाले आणि मोरारजींच्या भोवती कडं करून उभे राहिले. 'आमार दाबी मानते हॉबे' ह्या बंगाली ठेक्यात त्यांनीही आपली मागणी पुढे केली. म्हणाले, 'आमच्या नेपाळी भाषेला रेकग्निशन द्या, तिला इतर भारतीय भाषाभगिनींच्या रांगेत बसवून तिचा मानसन्मान करा, घटनेच्या आठव्या कलमात नेपाळीचाही समावेश करा !' पंतप्रधानांनी तत्क्षणी म्हटले--'हे होणे नाही !' हे शब्द ऐकताच सर्वांचं पित्त खवळलं आणि पंतप्रधानांच्या निषेधार्थ त्यांनी काळे झेंडे दाखविले. ( हे झेंडे बहुतेक प्रत्येकाने जवळ तयारच ठेवले असावेत. कारण पंतप्रधान आपली मागणी फेटाळून लावतील ह्याची त्यांना पुरेपूर कल्पना असावी. ) त्यांनी मग हरताळ जाहीर केला आणि तापलेल्या डोक्यांनी पसार झाले !

पण इकड सीझनच्या पाहुण्यांचे कोण हाल ! चार दिवस मजा मारायला आलेली मंडळी नुसती हैराण झाली. हॉटेलात जेवण तयार नाही, फिरायला गाईड नाहीत, उपासमारीमुळे झोप नाही ... चूक कोणाची अन् भोवली कुणाला !

असो ! ही सगळी भानगड ऐकल्यावर ज्योति बसूंनी समजावणीच्या सुरात म्हटलं की, पंतप्रधानांनी असं वागायला नको होतं हे मी त्यांच्याजवळ स्पष्ट म्हणून दाखवलंय बरं. नंतर त्यांनी सर्व 'नेपाळी बंधू' च्या पाठीवर थोपटून सांगितलं की बाळांनो, असे डोक्यात राख घालून घेऊ नका. तुमच्या वतीनं मी पंतप्रधानांशी जोरदार भांडण करीन हं. आता शहाणे व्हा कसे, अन् लागा आपल्या कामाला . . . ती बघा तिकडे किती माणसं तुमच्यासाठी खोळंबून बसली आहेत ती ! जा, त्यांना जेवू-खाऊ घाला, मनसोक्त हिंडवा, पैसे मिळवा . . . भाषेचं आपण नंतर बघून घेऊ !

--आणि चॉकलेटच्या आश्वासनावर विसंबून बसणाऱ्या बालकाप्रमाणे ती नेपाळी माणसं पुनश्च आपल्या कामाला लागली. आता लहान मुलं चटकन् विसरतात तसा ह्यांनाही विसर पडेल आपल्या मागणीचा तर बरी गत आहे, नाही तर . . . ज्योतिबाबू, तोवर दुसरी शक्कल योजून ठेवा बुवा ! *

## क्षुल्लक कांद्यासाठी ?–

अनेक वर्षांच्या सवयीनंतरही माणसाला एखाद्या शहराचा स्वभाव कळू नये हे आश्चर्यच ! भर दुपारी बारा ते चार ह्या वेळात बाजारात जायचं काम पडणार नाही इतकी दक्षता अनुभवाअंती माणसानं बाळगायला नको का ? आयुष्याचा प्रदीर्घ काळ कलकत्त्यात राहिल्यानंतर त्या गृहस्थांना तरी हे कळायलाच हवं होतं की, ह्या दुपारच्या वेळी बाजारात एकही वस्तू मिळू शकणार नाही म्हणून–त्यातही कांद्यासारखी क्षुल्लक वस्तू ! पण कडकडून भूक लागली. कांदेपोहे खाण्याची इच्छा झाली. बायकोनं उंच स्वरात ऐकवलं–'घरात कांदे नाहीत, संपले आहेत !' झालं ! गृहस्थ पिशवी घेऊन निघाला. घड्याळात दीडचा सुमार. बाहेर ऊन म्हणतंय्-मी ! माहीत होतं–आता बाहेर पडणं मूर्खपणाचं आहे; पण आशा वेडी असते ! कांद्यासाठी झपाटलेल्या मनःस्थितीत तो बाहेर पडला. लांबलचक रस्त्यानं हिंडत घराच्या इमारतीला प्रदक्षिणा घालून झाली आणि उन्हाचा ताप झेलीत घामाघूम झालेला तो तासाभरानं पुन्हा रिकामी पिशवी घेऊन घरी परतला !

कलकत्ता शहराचा एक स्वभाव लक्षात ठेवण्यासारखा आहे. इथं भर दुपारी बाजारात शुकशुकाट असतो. भाजीच्या टोपल्यांवर–ओले पोत्याचे तुकडे आंथरून, विकणारी माणसं चक्क हातपाय पसरून झोपा काढतात. त्यांच्या टोपल्यांतून भाजी दिसते; पण ती आपल्याला मिळू शकत नाही. कारण पैसे मिळत असले तरी माल विकण्याची त्यांची इच्छा नसते. तुम्ही 'कांदे अर्धा किलो दे; म्हटलं तरी ते म्हणतात, 'एखोन बिक्री हॉबे ना बाबू, चारटा शमय आशून !' चार वाजल्यानंतरच त्यांच्या विक्रीला सुरुवात होते. म्हणून कलकत्त्यात राहणारानं भर दुपारी कोणत्याही वस्तूची गरज पडू देऊ नये. एक तर सकाळच्या प्रहरीच दुपारची सोय करून ठेवावी किंवा संध्याकाळी सावकाश बाजारात जावं नि काय हवं ते घेऊन यावं. कारण दुपारी दुकानांना मोठमोठी कुलुपं असतात आणि भाजीबाजारातले सर्व लोक घोरत असतात. नाही तरी आमच्या वंगबंधूंच्या दुपारच्या झोपा मोडायचा तुम्हाला काय अधिकार आहे हो ? सांगा !

## कुरुक्षेत्र केरळ । लेखांक तिसरा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# तळागाळातल्यांना सामावून घेणारं स्वच्छ हिंदू संघटन

तेलीचेरी आणि आसपासच्या प्रदेशात मार्क्सवादी आणि संघवादी यांच्यामध्ये जवळजवळ सहा ते आठ महिने अधूनमधून चकमकी झडत होत्या. दोन्ही बाजूंची माणसं मारली गेली होती. कालिकतच्या मेडिकल सायन्सेस हॉस्पिटलमध्ये कोणाची माणसं जास्त दाखल होतात, याची तर अहमहमिकाच लागली होती. त्यातच दोन्ही बाजूंना पुरुषार्थ वाटत होता. हे सगळं पाहिल्यावर हा प्रकार केवळ 'स्थानिक' नसून याचे पडसाद केरळात इतरत्रही उमटण्याची शक्यता आहे, अशी भीती केरळच्या आघाडी-सरकारला वाटली असावी. त्यामुळे ३ एप्रिल रोजी केरळच्या विधानसभेमध्ये संघबंदी-वर चर्चा झाली. ही चर्चा व्हायला इतके दिवस का लागले, असाही एक प्रश्न आहे आणि केरळमधील राजकीय हिशेबात त्याचं उत्तर आहे. आपण हे पाहिलंच आहे की, मार्क्सवादीदेखील तेलीचेरी भागात शांततासमितीत सहभागी झाले ते त्यांचीही माणसे मारली जाऊ शकतात, हे कळल्यानंतर. त्यामुळे मार्क्सवाद्यांनी या सनदशीर चर्चेत सहभागी होण्याचा आग्रह धरावा, हे प्रतिक्रियेतून सुचलेले शहाणपण आहे. दुसरी गोष्ट अशी की, दि. ६ एप्रिलला प्रत्यक्ष तेलीचेरी गावात राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिसप्रमुख, डी. एस्. पी. इतक्या लोकांचा तळ पडणार होता. कारण ६ एप्रिलला तिथे चंद्रचूड यांचं भाषण होतं. म्हणून मुख्यमंत्र्यांना आपण काही तरी करतो आहोत, असं दाखवण्याची तीव्र गरज आहे असं वाटलं. तोपर्यंत सरकारचं धोरण आपले दोन शत्रू परस्परात कटून मरताहेत तर मरू देत, असंच होतं. मुसलमानांच्या दृष्टीने जोपर्यंत मुस्लिम मार्क्सवादी मरत नव्हते तोपर्यंत हा प्रश्न महत्त्वाचा होणंच शक्य नव्हतं. केरळमधील जनता पक्ष म्हणजे संघटना काँग्रेस आणि समाजवादी. यांनाही या प्रश्नात दोन कारणांमुळे रस नसणार. पहिलं कारण म्हणजे समाजवादी आणि संघ यांच्यात इतरत्रच देशभर चाललेला संघर्ष, तर दुसरं कारण संघटना काँग्रेसवाल्यांनी केरळात 'Wait and see' अशा तऱ्हेचं राजकीय धोरण अवलंबिलेलं. त्यामुळं त्यांनीही अशा चर्चेचा जसा फार आग्रह धरला नाही तसा फार विरोधही केला नाही. आता उरले केरळातले उघड समाजवादी. त्यांच्यामध्ये आठ जणांत चार पक्ष आहेत आणि असं असूनही 'जो तो समजे स्वतःला धरित्रीचा मध्यबिंदू' अशी त्यांच्यात परिस्थिती आहे. त्यामुळे त्यांना कोणी विचारत नाही. केरळ काँग्रेस मुख्यतः ख्रिश्चनांची. म्हणून त्यांचंही धोरण बघ्याचंच. अशा परिस्थितीत मार्क्सवाद्यांनीच या चर्चेची जोरदार मागणी केली, तर इंदिरा काँग्रेसवाल्यांनी तिचं स्वागत केलं. कारण इंदिराबाईंना देशभरच काय पण देशाबाहेरही संघ, संघ आणि संघच दिसतो. त्या मंडळींना ही आयती संधी चालून आली. केरळच्या मुख्यमंत्र्यांनाही सत्तारूढ आघाडी एकत्र राखण्याच्या कटकटीतून काही काळ सुटका मिळवणं आणि सरकार स्वस्थ नाही, अशी हवा निर्माण करणं यासाठी ही चर्चा उपयुक्त वाटली असणार. म्हणून 'संघावर बंदी आणू नये; पण सार्वजनिक ठिकाणी कवायती करण्यावर आणि शस्त्रे बाळगण्यावर बंदी घालण्यात यावी' अशा आशयाचा ठराव केरळचे मुख्यमंत्री पी वासुदेवन नायर यांनी विधानसभेत मांडला. ठरावावरील भाषणात श्री. नायर म्हणाले, 'संघाच्या सध्याच्या हालचालींमुळे केरळातील शांतता आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते निष्पाप, निरुपद्रवी नागरिकांवर हिंसक हल्ले करत आहेत ! त्याचप्रमाणे लूटमार, मारहाण आणि बलात्कारदेखील करत आहेत. आपल्या विरोधकांची हत्या करून त्यांना नष्ट करण्याचा चंग या लोकांनी बांधला आहे.

'संघाच्या कृतीपेक्षादेखील संघाचं तत्त्वज्ञान अधिक धोकादायक आहे. संघाचे सर्वश्रेष्ठ अधिकारी श्री. गोळवलकरगुरुजी यांनी हिटलरपासून स्फूर्ती घेतली होती. नाझींच्या धर्तीवर हिंदूंची संघटना करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. किमान आजच्या तरुणांना तरी संघाच्या या विषारी तत्त्वज्ञानापासून वाचवण्याचं कार्य आपण केलं पाहिजे. अर्थात संघासारख्या फॅसिस्ट संघटनेला केरळमधील बहुजन समाजाचा पाठिंबा कधीही मिळणार नाही, असा माझा विश्वास आहे.'

एम्. व्ही. राघवन हे मार्क्सिस्ट नेते म्हणाले की, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते मार्क्सवाद्यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करत आहेत. अशा तऱ्हेने हकनाक मरण्याची आमची तयारी नाही. आजपर्यंत कधीही आम्ही शस्त्र हातात घेतलेलं नाही; पण आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून स्व-संरक्षण करण्यासाठी शस्त्र हातात घेण्याची परवानगी आम्हाला देण्यात यावी.'

### चंद्रशेखरन यांचे भाषण

जनता पक्षातर्फे जनता पक्षाचे केरळ राज्याचे अध्यक्ष श्री. के. चंद्रशेखरन यांनी भाषण केलं. श्री. चंद्रशेखरन आपल्या भाषणात

म्हणाले,

'माननीय मुख्यमंत्र्यांना आज संघावर अशा तऱ्हेने उघड उघड टीका करण्याचं जे स्वातंत्र्य मिळत आहे त्याला संघाचे आणीबाणीच्या काळातील कठोर परिश्रम आणि कष्टच कारणीभूत आहेत. त्या काळचा दिवसांमध्ये एकाधिकारशाहीविरुद्ध ही एकच संघटना केरळमध्ये अतिशय प्रभावीपणे लढली.

'अर्थात हिंसा, मग ती कुणीही करो, त्याज्य आणि निंद्यच मानली पाहिजे; पण त्याचबरोबर कित्येक घटनांची शहानिशा न करताच त्या गृहीत धरून चालणंही बरोबर नाही. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था संघानं बिघडवली आहे, असं म्हणण्यामागं काही तरी राजकीय हितसंबंध गुंतलेले दिसतात. संघावर टीका करण्याच्या या रोगट चढाओढीत ईर्षेनं भाग घेणाऱ्या या मुख्यमंत्र्यांच्याच पक्षानं १९६७ साली बिहारमध्ये जनसंघाबरोबर युती करून सत्ता हाती घेतली होती, हे त्यांनी विसरू नये.'

संघावर टीका करणाऱ्या कॉंग्रेसवाल्यांकडे वळून श्री. चंद्रशेखरन यांनी त्यांना स्व. जवाहरलाल नेहरू आणि लालबहाद्दूर शास्त्री यांनी संघाबद्दल काढलेल्या गौरवोद्‌गारांची आठवण करून दिली. ते म्हणाले, '१९६२ साली चीनचे आक्रमण झाल्यावर संघाने जे कार्य केलं त्याबद्दल नेहरूंनी संघाला धन्यवाद दिले. इतकेच नव्हे तर दिल्लीतील २६ जानेवारीच्या प्रजासत्ताकदिनाच्या संचलनाला संघाला खास निमंत्रण देण्याचा आदेश दिला. १९६५ साली जेव्हा पाकिस्तानने भारतावर हल्ला केला तेव्हा त्या वेळचे भारताचे पंतप्रधान कै. लालबहाद्दूर शास्त्री यांनी आघाडीवर सैन्याला मदत करण्यासाठी, तसंच दिल्लीतील वाहतूकनियंत्रणासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची खास मदत घेतली होती. सध्या संघावर प्रच्छन्न टीका करणाऱ्या इंदिराजींनीदेखील आंध्रप्रदेशात जेव्हा वादळ झालं तेव्हा संघाच्याच लोकांनी सर्वप्रथम तिथं जाऊन मदतकार्य सुरू केल्याची कबुली दिली होती.

'संघस्वयंसेवकांवर लूटमार आणि बलात्कार केल्याचे जे आरोप इथे केले गेले आहेत ते संपूर्णतः बिनबुडाचे आणि निराधार आहेत. राज्यातील अल्पसंख्यांक जमातींवर स्वयंसेवकांनी हल्ले केल्याचा एकही प्रकार आजपर्यंत नोंदला गेलेला नाही.

'दुसरे स्वातंत्र्य मिळवण्याच्या कार्यात संघाची भूमिका आणि काम निर्णायक स्वरूपाचं ठरलं आहे. जनता पक्षाचा मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही आणि संघही जनता पक्षाशी कोणत्याही तऱ्हेनं संबंधित नाही, ही गोष्ट श्री. बाळासाहेब देवरसांनीच वारंवार स्पष्ट केली आहे.

'तेव्हा हा ठराव राजकीय हेतूनं आणला गेला असल्यामुळं मी आणि माझा पक्ष त्याला पाठिंबा देऊ शकत नाही; तसेच त्यावरील मतदानातही भाग घेण्याची आमची इच्छा नाही!'

या भाषणानंतर श्री. चंद्रशेखरन यांनी आपल्या पक्ष-सदस्यांसह सभात्याग केला. इथे आणखी एक नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे श्री. चंद्रशेखरन हे पूर्वाश्रमीचे समाजवादी आहेत. त्यामुळे देशात इतर ठिकाणी समाजवादी ज्या तऱ्हेनं वागत आहेत आणि बोलत आहेत त्याच्याशी चंद्रशेखरन यांचं हे वक्तव्य निश्चितच विसंगत वाटेल. केरळ जनतापार्टीचा अध्यक्ष चंद्रशेखरच असावा आणि त्यानंही वरच्या चंद्रशेखरसारखीच भूमिका घ्यावी हा एक गमतीचा योगायोग होता. अर्थात हे सगळं राजकारणी मायाजाल आहे. हृदयपरिवर्तनाचं उदाहरण नव्हे. केरळातल्या चंद्रशेखरांना सुद्धा हा शहाणपणा शेवटच्या मिनिटाला सुचला. कदाचित जनता पक्षातील एका घटकाशी संबंधित असलेल्या संघटनेची बदनामी होत असताना शाब्दिक निषेधसुद्धा केला नाही, म्हणून पक्षाचे केंद्रीय नेतृत्व आपल्याला जाब विचारील, असंही त्यांना वाटलं असेल. चर्चेच्या दिवशी आयत्या वेळी खूप धावपळ झाली आणि खचाखच भरलेल्या प्रेसगॅलरीमधल्या 'हिंदुस्थान समाचार'च्या वार्ताहराकडे चंद्रशेखरन यांच्या एका दूताने धाव घेतली. 'संघाबद्दल निदान चार चांगल्या गोष्टी आम्हाला सांगा,' असा निरोप दिला आणि त्या वार्ताहरानं वरील भाषणातील नेहरू आणि शास्त्री यांचे संदर्भ लगेच सुचवले. जनता पक्षातील सर्वच घटकपक्षांनी एकमेकाला हा निरोप पाठवण्याची आवश्यकता आहे. अन्यथा त्यांना परस्परांच्या चार चांगल्या गोष्टी कधी माहीत होतील, असं वाटत नाही. खरं म्हणजे त्या माहीतही आहेत; पण उच्चारताना लाज वाटते. उद्या राजनारायण आणि मधू लिमये संघाचं असं गुणगान करू लागले तर भारतात 'दुसऱ्या स्वातंत्र्या'चा अतिरेक होऊन 'तिसरे स्वातंत्र्य' अस्तित्वात आलं आहे, अशी घोषणा करावी लागेल. मग 'तिसऱ्या शक्ती'चं काय होईल ते होईल! परंतु एक लक्षात ठेवले पाहिजे की, चंद्रशेखरन यांच्या भाषणातील एकही शब्द पुण्याच्या 'तरुण भारत'मध्ये छापून आला नाही. कदाचित हा 'साधने'वरचा राग असेल. कदाचित कोचीनहून येणाऱ्या वार्तापत्रातच त्याचा उल्लेख झाला नसेल. ही प्रवृत्ती इष्ट नाही. लोकशाहीला उपकारक तर मुळीच नाही.

यानंतर इंदिरा कॉंग्रेसचे सदस्य श्री. पी. आर. कुरूप यांनी या चर्चेसाठी संघाच्याही प्रतिनिधीला निमंत्रित करणे आवश्यक होते. असं सांगितलं. त्याचप्रमाणे सध्याच्या या परिस्थितीला मार्क्सवादीदेखील जबाबदार आहेत आणि तरीही मार्क्सवाद्यांना खूष करण्यासाठी सरकारनं हा ठराव आणला आहे, अशी पुस्तीही जोडली.

नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रंट या पक्षाचे सदस्य श्री. सुन्दरेशन नायर म्हणाले की, 'केरळमधील संघाच्या या वाढीला सरकारचं हिंदुविरोधी धोरणच अधिक कारणीभूत आहे. ख्रिश्चन आणि मुस्लिम या अल्पसंख्यांक जमातीच्या जातीयवादामुळंच प्रतिकाराच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात ही संघटना आज केरळात वाढत आहे आणि मतांसाठी मुस्लिम व ख्रिश्चनांचा अनुनय करण्याचं जे धोरण सर्वच राजकीय पक्षांनी अवलंबिलं तेही या घटनेला जबाबदार आहे.'

यानंतर संघावर संपूर्णपणे बंदी आणू नये; पण संघाच्या सार्वजनिक ठिकाणी कवायती करण्यावर आणि शस्त्रे बाळगण्यावर मात्र बंदी घालण्यात यावी, अशा आशयाचा ठराव मंजूर झाला. अर्थात ठराव मंजूर होणं अजिबात कठीण नव्हतं. कारण संघाबद्दल द्वेष असणारे आणि मिळेल त्या मार्गानं संघाचं शक्य तितकं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करणारीच मंडळी सभागृहात होती. त्यामुळं संघावर संपूर्ण बंदी आली नाही, याचाच काही जणांना विषाद वाटला असेल. या चर्चेचा संघविरोधकांना आणखीही एक फायदा झाला. किमान एका तरी विषयावर आपल्या सर्वांचं एकमत होऊ

शकतं, असा सुखद धक्का या सर्वांनाच बसला. तसंच आपलं पुरोगामित्व सिद्ध करण्याची ही एकमेव संधी आहे हे ओळखून सर्वांनीच तिचा पुरेपूर फायदा घेतला. कारण केरळातील आघाडी सरकारांचं हे वैशिष्टयच आहे की, या सरकारांच्या घटकपक्षांमध्ये क्वचितच एकमत होतं आणि अगदी मार्क्सवाद्यांनीदेखील पुरोगामीपणाचा किती जरी आव आणला तरी तसा तो आचरणात-आणणं त्यांनाही फार कमी वेळा जमतं. महाराष्ट्रात मात्र अशा प्रकारची चर्चा झाली त्या वेळी त्या चर्चेचा परस्परात एकवाक्यता आणण्यासाठी उपयोग महाराष्ट्र जनता पक्ष आणि समांतर काँग्रेस यांनीच करून घेतला व संघविरोधक एकटे पडले. महाराष्ट्राच्या मुरब्बी मुख्यमंत्र्यांनी तर 'आत्मपरीक्षण' वगैरेही शब्द वापरलेत व 'जातीयता कोणामध्ये नाही?' असा सूर लावला. पूर्वी वसंतराव नाइकांनीसुद्धा बावडा–प्रकरणाच्या वेळी 'आपण सारेच एकत्र येऊन अस्पृश्यांचा प्रश्न सोडवू या!' असं म्हणून विरोधकांनाच मिठी मारली होती. शरद पवारांची आत्मपरीक्षणाची भाषाही फारशी वेगळी नाही. प्रश्न एकच; पण राज्य वेगळं, राजकारण वेगळं, हिशेबही वेगळे!!

विधानसभेतील या गरमागरम चर्चेचा दोन्ही गटांमधील प्रत्यक्ष कार्यकर्त्यांवर किती प्रभाव पडला? मुख्यमंत्र्यांनी तेलीचेरीमध्ये आपले ६ तारखेला कार्यक्रम आहेत, त्याला प्रतिरोधक म्हणून ही चर्चा घडवून आणली आणि ६ तारखेला संध्याकाळी सर्व वरिष्ठ सरकारी मंडळी तेलीचेरीत असताना आसपासच्या दहा मैलांच्या परिसरात ७१८ चकमकी झाल्या व त्यात एक स्वयंसेवक व तीन मार्क्सवादी ठार झाले. सरकारी पातळीवर हा प्रश्न सुटावा, सुटेल असं दोन्ही गटांना वाटतच नाही. केरळच्या पोलिसप्रमुखांनी या प्रकरणी दंगल करणारे लोक हे बाहेरच्या राज्यांमधून आले होते, असा प्राथमिक अहवाल दिल्यामुळं प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं झालं आहे. दोन्ही गट अधिकाधिक कुशल होत चालले आहेत हा याचा मुख्य अर्थ. तरीदेखील अजूनही दोन्ही बाजूंकडून बंदुका, पिस्तुलं यांसारखी sophisticated शस्त्रं वापरली गेलेली नाहीत, त्यामुळं एकूण मृत्यू आणि रक्तपात बराच मर्यादित स्वरूपात राहिला आहे.

केरळ विधानसभेमधल्या या चर्चेत काही गोष्टी ठळकपणे जाणवल्या. संघाविषयी एकही नवीन आक्षेप शोधून काढण्यात संघविरोधकांना यश मिळत नाही, ही अखिल भारतीय वस्तुस्थिती केरळातही दिसते. या भाषणांमधून संघाच्या कार्यपद्धतीविषयीचं अज्ञानही प्रकट होतं. संघ केरळमध्ये कोणाच्याही राजकीय सत्तेला आव्हान देण्याइतका मोठा झालेला नाही, हे तर स्पष्ट होतंच; पण त्याचबरोबर हिंदु बहुजनसमाज फार झपाट्यानं संघाकडे वळू लागल्याची भीती केरळातल्या सर्व राजकीय पक्षांना वाटू लागली आहे! याचीही कबुली या चर्चेत मिळते. मार्क्सवादीसुद्धा हादरले आहेत. तेलीचेरीसारख्या मलबारमधील त्यांच्या बालेकिल्ल्यात एवढी तीव्र प्रतिक्रिया उमटताच 'आम्ही हे सहन करणार नाही!' अशा चवताळलेल्या भाषेत ते बोलू लागले आहेत; पण त्यांनी सहन केलं. त्यांना सहन करणं भाग पडलं ही वस्तुस्थिती आहे. पोटनिवडणुकी पूर्वीचा दीड महिना व नंतरचा एक महिना तेलीचेरी शांत आहे. ही शांतता, सध्या तरी मार्क्सवादी यातून योग्य धडा शिकत आहेत याची द्योतक वाटते. केरळभर असं झालं व मार्क्सवादी कार्यकर्ते बळी पडू लागले तर त्यांना ते परवडणार नाही. एवढंच नाही तर सध्यादेखील सर्व इतर राजकीय पुढारी खाजगीमध्ये मार्क्सवाद्यांचं शस्त्र त्यांच्यावरच उलटल्याबद्दल समाधानच व्यक्त करतात. मुसलमान मार्क्सवाद्यांना याच्याबाहेर ठेवून संघाच्या कार्यकर्त्यांनी फार मोठा धोरणीपणा दाखवला आहे; पण त्याबरोबरच मार्क्सवाद्यांना यशस्वीपणे तोंड दिल्यामुळं फार मोठ्या प्रमाणात तेलीचेरीतील मतदार आपण सांगू त्या उमेदवाराला मतं देतील हा त्यांचा अंदाज साफ धुळीला मिळाला व तेलीचेरीतील मार्क्सवादी उमेदवार पूर्वीपेक्षा तिप्पट अधिक मतं मिळवन विजयी झाला. या सर्व घटनांचे पडसाद भारतभर उमटत आहेत. विचारवंत, समाजकार्यकर्ते आणि राजकीय पुढारी या प्रश्नाकडे कसे वेगवेगळ्या दृष्टींनी पाहू लागले आहेत याची काही उदाहरणं पुढे देत आहोत.

## नयनतारा सैगल

याच विषयाच्या निमित्ताने स्व: पंडित नेहरू यांची भाची श्रीमती नयनतारा सैगल यांनी मदुराईहून प्रसिध्द होणाऱ्या 'इंडियन एक्सप्रेस' च्या १५ मेच्या अंकामध्ये एक लेख लिहिला होता. लेखाचं शीर्षक होतं– 'For Whom The Bell Tolls' लेखाची सुरुवातच सैगलबाईंनी अशी केली होती–

'मला समजत नाही की, हिंदुत्ववादामध्ये असं काय आहे की, ज्यामुळं इतक्या जोरदारपणे त्याचा पुरस्कार केला जातो किंवा तो झिडकारला जातो? भारतीय मुस्लिम हा, आपण मुस्लिम आहोत हे शांतपणे मान्य करतो आणि त्याला योग्य वाटेल त्या कर्मकांडाचा स्वीकार करतो किंवा त्याग करतो. त्याचप्रमाणे कोणताही ख्रिश्चन मनुष्य बायबल लपवून ठेवत नाही किंवा ख्रिश्चन धर्माचं नाव निघालं की शरमेनं तोंड लपवत नाही; पण हिंदू मनुष्य मात्र अजूनही गोंधळातच सापडलेला आहे. आपल्याला जर आधुनिक व्हायचं असेल तर आपण हिंदुत्ववाद दूर भिरकावून दिला पाहिजे, असं त्याला वाटतं किंवा मग एखादा कट्टर हिंदुत्ववादी अतिशय चुकीच्या आणि निसरड्या मुद्द्यांच्या आधारे हिंदुत्ववादाचं समर्थन करतो. केवळ दैवयोगानं ज्या धर्माचे आपण वारसदार झालो आहोत त्या धर्माचं सारासार विचार करून पृथक्करण करणं फारच थोड्या लोकांना जमतं आणि तरीदेखील, या देशातील हिंदु हिंदुत्ववादाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, त्यासंबंधानं काय धोरण आखतो यावरूनच आपण पुढं जाणार की आपल्या देशाच्या सीमांपलीकडील इस्लामिक राष्ट्रांमध्ये जे भयानक चित्र दिसतं तसं आपण पुन्हा जुन्याच्याच कच्छपी लागणार हे ठरणार आहे.'

साहजिकच हिंदु आणि हिंदुत्ववादाची ही चर्चा करताना सैगलबाई हिंदुमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन संघटनांशी येऊन थांबतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल त्या म्हणतात,

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं मुख्यत्वे दोन ध्येयवाक्य दिली आहेत. एक देशभक्ती रुजवणं आणि दुसरं म्हणजे सर्व हिंदूंना एकाच बॅनरखाली एकत्र आणणं. यापैकी पहिलं सद्य:स्थितीमध्ये फारसं लागू होणारं आणि महत्त्वाचं नाही; पण दुसरं जे ध्येय आहे ते मात्र अतिशय योग्य आणि महत्त्वाचं आहे. कारण आज ९ कोटी अस्पृश्य हिंदुत्व-

वादापासून अलग राहिले आहेत आणि कोणतीही समानतेची वागणूक त्यांना मिळत नाही. फक्त निधर्मी राज्यघटना आणि ती राबवणारी स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारं यांनीच काय तो या समाजाचा थोडासा भाग वर आणण्याचा प्रयत्न केला आहे. तरीदेखील अगणित लोक अद्याप त्याच हीनदीन अवस्थेत खितपत पडले आहेत; पण हिंदुत्ववादाचा कोणताही पुरस्कर्ता यांची दखल घेत नाही. चार जगद्‌गुरूंची नुकतीच जी 'ऐतिहासिक' भेट झाली त्या वेळीही या भयानक असमानतेकडे संपूर्ण काणाडोळा करण्यात आला. मग एखाद्या हरिजनानं संधी मिळेल या आशेनं बौद्धधर्माचा किंवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? एखाद्याला जर स्वाभिमानानं जगण्याची संधी मिळत असेल तर तो लाचारीचं लाजिरवाणं जिणं कशाला जगत राहील? तेव्हा उच्च-वर्णीय हिंदूंची हिंदूसाठी संघटना बांधण्यापेक्षा या तळागाळातल्या समाजाला ज्यामध्ये सामावून घेतलं जाईल अशी एक हिंदूंची संघटना बांधणं हे आजच देशापुढील एक महत्त्वाचं कार्य आहे.

'हे ध्येय साध्य करण्यासाठी एखाद्या लढाऊ आणि समाजामध्ये खोलवर पसरत गेलेल्या संघटनेची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंच हे कार्य हातात घ्यायला काय हरकत आहे? जर हिंदुसंस्कृती आम्हाला मौल्यवान वाटत असेल तर ही संस्कृती ज्यामध्ये अधिकाधिक फुलत जाईल असं वातावरण आज आम्ही निर्माण करणं आवश्यक आहे आणि त्यासाठी सर्व हिंदूंची भीषण गांजवणुकीतून मुक्तता करणं हे आपल्या सर्वांचं आद्य कर्तव्य असलं पाहिजे.

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचं काम करू शकेल का? भारतीय राजकारणामध्ये आजपर्यंत अतिशय विचित्र, अनाकलनीय घटना घडलेल्या आहेत. ज्या चळवळीतून आपण स्वातंत्र्य मिळवलं तीच चळवळ आपल्यावर हुकुमशाहीदेखील लादू पहात होती. १९३० साली किंवा त्यानंतर अगदी चार दशकांनी सुद्धा असं काही घडेल यावर कुणी विश्वास ठेवला असता का?

'आज हिंदुनेतृत्वाचा संपूर्ण अभाव आहे. ज्या धंदेवाईक हिंदु राजकारण्यांनी सार्वजनिक सभा-भाषणांमधून वेदशास्त्रांमधील वाक्य श्रोत्यांवर फेकली तेच लोक हू का चू न करता आणीबाणीला संपूर्णपणे शरण गेले! विनोबा भावे यांच्याकडे आपण काही नेतृत्वाच्या आशेनं पहात होतो तर ते आणीबाणीमध्ये हजारो लोकांवर अत्याचार होत असताना मूग गिळून स्वस्थच बसले, त्यामुळे आत्ता ते काही नेतृत्व देऊ शकतील अशी आशा धरणं व्यर्थ आहे.

'तेव्हा सर्वत्र अशी गोंधळाची परिस्थिती असताना, कुठल्याच स्वरूपाचं तर्कशास्त्र लागू होत नसताना ज्यांनी हुकुमशाहीशी लढा दिला त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंच नवीन धोरण आखून कोण-त्याही पक्षाला, सभागृहाला आणि सरकारला जे जमलेलं नाही ते करून दाखवण्याची अपेक्षा बाळगणं फारसं चुकीचं ठरणार नाही. अतिशय शिस्तबध्द अशी ही हिंदुसंघटना या बुरसटलेल्या प्रथांवर हल्ला करून स्वच्छ हिंदु संघटन उभं करण्यास निश्चितच समर्थ आहे!'

श्रीमती नयनतारा सैगल यांच्या या लेखानंतर चार-पाच दिवसांतच 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरात श्री. टी. जी. रामचंद्र राव या मद्रासच्या गृहस्थांचं 'The Press and The R. S. S.' या शीर्षकाखाली एक पत्र प्रसिद्ध झालं. या पत्रात श्री. राव म्हणतात–

'हिंदुत्वविरोध हे आजच्या भारतीय बुद्धिवंतांचं एक वैशिष्टयच झालं आहे. निरनिराळ्या प्रचारमाध्यमातूनही तेच अनुभवाला येतं. या पार्श्वभूमीवर श्रीमती नयनतारा सैगल यांचा 'For Whom The Bell Tolls' हा लेख निश्चितच नवा विचार देणारा होता.

'पाश्चिमात्य शिक्षण घेतलेला आणि डावी विचारसरणी डोक्यात भरवली गेलेला हिंदु मनुष्यच हिंदुत्वविरोधी एवढं आकांडतांडव करतो; पण सामान्य हिंदु मनुष्य निराळ्याच तऱ्हेनं विचार करत असतो. डाव्या विचारसरणीचे बुद्धिवंत हिंदुधर्माची तत्त्वं आणि आचरण यावर 'जातीयवादी' म्हणून हल्ले चढवतात आणि प्रचार-माध्यमांवरही त्यांची पकड असल्यानं हिंदुधर्माचा बहुजनसमाजावर असलेला पगडा दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे. अर्थात हे तथाकथित बुद्धिवंत मुस्लिम, ख्रिश्चन आणि शीखधर्माची मात्र तोंड भरून स्तुती करत असतात.

'समाजामध्ये देशभक्ती निर्माण करण्याचं कार्य सद्यःस्थितीमध्ये फारसं लागू होत नाही, हे लेखिकेचं म्हणणं वादग्रस्त आहे. आज भारतामध्ये प्रत्येक माणसाच्या विचारात आणि कृतीमध्ये स्वार्था-पलीकडे काहीही दिसत नाही, हे नष्ट करणं आवश्यक आहे. कारण स्टीव्हनसन म्हणतो त्याप्रमाणे, देशभक्ती हा क्षणाचा स्फुल्लिंग नसून आयुष्यभर नेटानं आणि प्रामाणिकपणे करावयाचं ते कार्य आहे. तेव्हा प्रत्येक भारतीय माणसानं या दृष्टिकोनातून काम केलं तरच देशाची प्रगती होऊ शकेल आणि हे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, फक्त संघच हाती घेऊ शकेल!

'सर्व हिंदूंना एकाच बॅनरखाली एकत्र आणण्याचं कामही संघानं यशस्वीपणे सुरू केलेलं आहे. प्रचंड संख्येनं असणाऱ्या अस्पृश्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये आज स्थान मिळत आहे. हिंदूंच्या एकात्मतेचं उद्दिष्ट राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निश्चितच साध्य करू शकेल. इतरांकडुन फक्त एकच अपेक्षा आहे की, त्यांनी संघावर क्षुद्र आणि संकुचित हल्ले करणं सोडून द्यावं!'

दक्षिण भारतातल्या सामान्य आणि तटस्थ माणसाचं संघाविषयी काय मत आहे आणि संघाकडून त्याच्या काय अपेक्षा आहेत हे दोन्हीही या पत्रात चांगल्या तऱ्हेने व्यक्त झालं आहे.

## सैतानाची वकिली!

श्री. ए. पी. उदयभानू हे केरळातील एक प्रतिष्ठित नागरिक. स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशनचे ते अध्यक्ष आणि कालिकतच्या 'मातृभूमी' या दैनिकाचे संपादक होते. तसंच काही काळ श्री. उदयभानू हे प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्षही होते. राज्यसभे-मध्ये खासदार म्हणूनही त्यांनी काम केलं आहे. आता ते त्रिवेंद्रमला सेवानिवृत्तीचं आयुष्य जगत असून 'केरळभूषणम्' या साप्ताहिका-मधून नियमित लेखनही करत असतात.

इतरांप्रमाणेच श्री. उदयभानूंचं संघाविषयी पूर्वग्रहदूषित मत होतं; पण संघ जवळून पाहिल्यावर त्यांना अगदीच निराळा अनुभव आला. तोच अनुभव त्यांनी 'Devil's Advocate' हा लेख लिहून शब्दां-

कित केला आहे. अर्थात Devil हे विशेषण बाकी कोणालाही उद्देशून नसून संघालाच लावलेलं आहे. कारण अजूनही केरळमध्ये बऱ्याच ठिकाणी संघाबद्दल हेच मत पसरवण्यात येत आहे. त्यामुळंच या Devil ची सैतानाची वकिली करायला श्री. उदयभानू या ठिकाणी उभे राहिले आहेत. आपल्या लेखामध्ये श्री. उदयभानू म्हणतात—

'मी जरी गोहत्येच्या विरुद्ध असलो तरी आंधळ्या संघविद्वेषालाही माझा विरोध आहे.

'समाजसेवेपासून केव्हाच लांब गेलेले आणि लुटालुटीमध्येच गुंग झालेले आजचे राजकारणी संघाच्या एवढे विरोधी का आहेत याचं कारण उघड आहे. निष्ठापूर्ण जीवन जगणाऱ्या तरुणांची त्यांना भीती वाटत आहे. कारण वेळ आली तर सेवा आणि त्याग या शक्तींपुढं सर्वांनाच नमतं घ्यावं लागतं. अशा तऱ्हेची निष्ठा निर्माण करण्याचं तंत्र कम्युनिस्ट आणि काँग्रेसवाले केव्हाच विसरून गेले आहेत! एक छोटासा प्रसंग सांगतो.

'१९७६ साली कालिकतच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या कोळ्यांचं वादळामध्ये काही नुकसान झालं होतं. तेव्हा त्यांना सहाय्य देण्याचा एक छोटासा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मी या कार्यक्रमाचा अध्यक्ष होतो; पण तो कोणी आयोजित केला होता ते मला माहीत नव्हतं जेव्हा तो संघाच्या लोकांनी आयोजित केला आहे असं मला कळलं तेव्हा मला फारच संकोचल्यासारखं झालं; पण मदत स्वीकारणाऱ्यांपैकी बरेचजण मुसलमान आहेत, हे जेव्हा पाहिलं तेव्हा मला थोडसं हायसं वाटलं.

'याच वेळी आणखीही एक घटना मला आठवली.त्या वेळचे केरळ प्रदेशचे काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. ए. के. अँटनी यांनीही अशाच तऱ्हेचा मदतनिधी उभारला होता. मी त्या निधीला ५०० रु. दिले होते; पण आजतागायत या निधीद्वारा जमलेले पैसे कोणालाही वाटण्यात आल्याचं माझ्या ऐकिवात नाही !

'एकदा मी संघामध्ये केवळ उच्चवर्णीयांचा भरणा असतो अशी टीका केली. त्या वेळी हातावर राखी बांधलेला एक हरिजन मुलगा समोर आला आणि म्हणाला, 'आमच्या संघामध्ये जातीला स्थानच नाही !'

'आणीबाणीच्या काळात माझं बंद असलेलं मन थोडसं अधिक उघडलं. या काळात संघाच्या कार्यकर्त्यांवर अतिशय क्रूर अत्याचार केले जात होते. मार्क्सवाद्यांनीदेखील भीतीनं आणीबाणीविरोधी लढा मागं घेतला. माझ्याकडे जेव्हा काही संघस्वयंसेवक आले तेव्हा मी त्यांना अतिशय कळकळीनं विचारलं, 'कोणताही प्रतिकार न करता तुम्ही हे सारं सहन कसं करू शकता ?' त्या स्वयंसेवकांनी जे उत्तर दिलं ते ऐकून मी पार विरघळलो. स्वयंसेवक म्हणाले, 'आम्ही हे सारं सहन करू. आम्ही प्रत्युत्तर देणार नाही, कारण त्यामुळं देशामध्यें कदाचित् यादवी युद्धाला सुरुवात होईल. हे कधीही होता कामा नये! जे पाकिस्तानचं झालं आहे तेच हिंदुस्थानचं होईल. आम्ही काय वाटेल ते सहन करू, पण हा हिंदुस्थान उध्वस्त होऊ देणार नाही !' माझं दुबळं मन कधी असा विचारच करू शकत नाही. उलट मी विचार करेन, देशाला आग लागली तरी चालेल, मी प्रत्युत्तर दिल्याशिवाय राहणार नाही !'

श्री. उदयभानूंचं हे निवेदन अतिशय महत्त्वाचं आहे. कारण ते स्वतः एक जबाबदार आणि प्रतिष्ठित नागरिक आहेत: तसंच केरळमधल्या राजकीय आणि सामाजिक जीवनामध्येच ह्यांनी आपलं सारं आयुष्य व्यतीत केलेलं आहे आणि याहूनही सर्वांत महत्त्वाचं म्हणजे या घटना घडण्यापूर्वी व हा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी ते कट्टर संघविरोधक समजले जात.

आर्यकन्दी अच्युतन हे पूर्वी मार्क्सवादी पक्षाचे नेते होते. त्यानंतर ते सी. पी. आय. ( एम. एल. ) चे नेते झाले आणि आणीबाणीनंतर त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला आहे. केरळमधील राजकारणाचा कल पाहता श्री. अच्युतन यांचा हा प्रवास फारसा आश्चर्यकारक वाटू नये.

श्री. अच्युतन म्हणतात, 'आणीबाणी उठल्यानंतर एकट्या कन्नोर जिल्ह्यात पस्तीस खून झाले. त्यापैकी ३१ जण काँग्रेसचे होते, तर उरलेले चार इतर पक्षांचे होते. मार्क्सवादी लोकांनी जणू त्यांचा स्वतःचा पक्ष वगळता इतर सर्व राजकीय पक्षांना नष्ट करण्याचाच चंग बांधला आहे. इतकंच नव्हे तर एम. रवी नावाच्या एका मार्क्स-

## करुणाकरन आणि इंदिराजी

आम्ही ज्या दिवशी करुणाकरन यांची भेट घेणार होतो त्याच दिवशी सकाळी इंदिराजींनी तंजावरमधून नाट्यमय माघार घेतल्याची बातमी सर्व वर्तमानपत्रांमध्ये झळकली होती. त्यामुळे करुणाकरन यांच्याशी बोलताना तो विषय येणं अपरिहार्यच होतं; पण करुणाकरनसाहेबांनी बाईंचं जोरदार समर्थन केलं. इंदिराजींनी राजकारणात आणि पर्यायानं लोकसभेमध्ये असणं आवश्यक आहे. कारण त्यांच्याशिवाय अल्पसंख्यांक आणि दलितांचं प्रतिनिधित्व कोण करणार ? तंजावरमधून निवडणूक लढवण्याचं रद्द केलं, कारण एम. जी. रामचंद्रन हा अपेक्षेइतका प्रभावी नेता नाही. भारतामध्ये इंदिराजीइतके अचूक आणि धाडसी निर्णय घेणारा दुसरा नेता नाही ! इंदिराजींना बहुजनसमाजाचा संपूर्ण पाठिंबा आहे. अजूनही त्या देशातील सर्वांत लोकप्रिय नेत्या आहेत ! १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेऊन इंदिराजींनी लोकशाही वाचवली, हे त्यांचं जगाच्या इतिहासाला असलेलं ( contribution ) आहे. अशी अनेक करमणूकप्रधान विधानं करुणाकरन यांनी केली. ही विधानं ते सवयीच्या सराईतपणाने करत होते असं दिसलं. आम्ही संजय गांधींचं नेतृत्व कधीही मान्य करणार नाही, असं डोळे मोठे करून त्यांनी सांगितलं. अजूनही देशातले सच्चे काँग्रेसवाले एकत्र आले तर देशाला ते तारून नेतील, अशी ग्वाही दिली. जनता सरकारइतकं देशाचं वाटोळं दुसऱ्या कोणीही केलं नाही, असं ठामपणे सांगितलं. प्रेसवाले सर्वच बातम्या खोडसाळपणे आणि विपर्यस्त स्वरूपात देतात, असा एक शितोडा आमच्यावरही उडवला. एकूण चांगली करमणूक झाली. सतत आठ-दहा दिवस संघ आणि मार्क्सवाद यापलीकडे फारसं काही वाचलं, बोललं, किंवा ऐकलं नव्हतं. करुणाकरनसाहेबांनी चांगला relief दिला !

*

वादी टॅक्सी-ड्रायव्हरलाही बेशिस्तपणे वागल्याबद्दल ठार मारण्यात आलं. म्हणूनच एक मार्क्सवादी नेता विषादानं म्हणतो, 'कठीण प्रसंगाला तोंड देण्याची हिम्मत नसणाऱ्या या खुन्यांनी मार्क्सवादी पक्षाच्या प्रतिष्ठेला धक्का दिला आहे, प्रतिमेला कलंक लावला आहे !'

## अच्युतराव पटवर्धन

९ जूनच्या 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये श्री. अच्युतराव पटवर्धन यांचा 'Janata, R. S. S. and the Nation' या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध झाला आहे. संघाशी कित्येक मुद्द्यांवर मतभेद असूनही श्री. अच्युतरावांनी संघाची शिस्त आणि देशप्रेम यांचं आणीबाणीच्या काळात तुरुंगामध्ये असताना जे दर्शन घडलं त्याबद्दल मोकळेपणानं कबुली दिली आहे. त्याचप्रमाणे श्री. मधू लिमये आणि त्यांच्यासारखी जी मंडळी संघावर टीका करत आहेत, ती स्वतःच्याच सदसद्विवेकबुद्धीवर अन्याय करत आहेत, हेही त्यांनी नमूद केलं आहे. स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतलेले व सध्याचे एक अपक्ष राजकीय निरीक्षक सहप्रवासी म्हणून अच्युतरावांचं हे म्हणणं अतिशय महत्त्वाचं आहे.

'संघ हे समाजशिक्षणाच्या दृष्टीनं अतिशय ताकदवान माध्यम असल्यामुळं त्यांनी विशिष्ट धर्म-वंशापर्यंतच आपलं कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता संपूर्ण मानवजातीच्या उत्थापनासाठी काम करणं आवश्यक आहे. चारित्र्याला अतिशय महत्त्व देणारी, कार्यकर्त्यांचं जाळं सर्वत्र पसरलेली संघ ही या देशातील एकमेव संघटना आहे. तेव्हा आता या संघटनेनं अल्पसंख्यांकांना असुरक्षित वाटणार नाही अशा तऱ्हेनं देशातील सांस्कृतिक पुनरुज्जीवनास हात घातला पाहिजे' अशी अपेक्षाही अच्युतरावांनी या लेखामध्ये व्यक्त केली आहे.

याआधी दिलेला श्रीमती नयनतारा सैगल यांचा लेख आणि हा वर उल्लेखिलेला अच्युतरावांचा लेख या दोन्ही लेखांमध्ये काही महत्त्वाची साम्यस्थळं दिसतात. देशातील प्रमुख विचारवंतांमध्ये समावेश असणाऱ्या या दोन्ही लेखकांनी संघाची शिस्त आणि देशप्रेम याबद्दल मुक्त कंठानं स्तुती केलेली आहे. संघाचं संघटन आणि निष्ठावान कार्यकर्त्यांचं देशभर पसरलेलं जाळं यामुळं हे दोन्हीही विचारवंत प्रभावित झालेले आहेत आणि म्हणूनच या दोघांनीही भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांतीचं कार्य संघच करू शकेल, अशी अपेक्षा आणि विश्वास व्यक्त केला आहे. संघाचे विद्यमान सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी एका मुलाखतीत असं म्हटलं होतं की, 'डॉ. हेडगेवारांच्या काळात संघाचं कार्य राजकीय स्वरूपाचं होतं, कै. श्री. गोळवलकरगुरुजींच्या काळात ते मुख्यत्वे सांस्कृतिक स्वरूपाचं होतं; परंतु आता बदलत्या परिस्थितीनुसार संघानं सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची आवश्यकता आहे.' संघाच्या सरसंघचालकांची संघाकडून असलेली अपेक्षा आणि संघाचं तटस्थपणे पृथक्करण करणाऱ्या श्रीमती नयनतारा सैगल व श्री. अच्युतराव पटवर्धन यांच्यासारख्या सामाजिक विचारवंतांची संघाकडून असलेली अपेक्षा यामध्ये एवढं प्रचंड साम्य असावं ही बाब केवळ 'योगायोग' म्हणून चालणार नाही. देशातील प्रत्येक सामाजिक विचारवंत संघाबद्दल एकाच दिशेनं विचार करत आहे, याचं हे द्योतक आहे. एकीकडे राजकीय स्वार्थापोटी सर्व देशभरच्या अल्पसंख्यांक जमातींना वाटणारी असुरक्षितता, हिंदूंमध्ये असणारी कठोर जातीयता व कनिष्ठ जातींचा मागासलेपणा, हिंदुस्थानच्या आर्थिक पुनर्रचनेला असणारा प्रस्थापित वर्गाचा विरोध आणि त्यामुळं आलेली आर्थिक गतिहीनता या सर्व पापांचे धनी संघाचे कार्यकर्ते आहेत, असे आरोप सर्वत्र देशभर केले जात आहेत आणि संघ तर, आम्ही आता सामाजिक क्षेत्रातून मागे हटणार नाही, म्हणजेच पर्यायाने राजकीय सत्ता, पक्ष, निवडणुका यांच्यापासून दूर जाणार नाही, अशी प्रतिज्ञा करून बसला आहे. त्या दृष्टीने काही राज्यांमध्ये झपाटयानं काम झालं आहे. उदाहरणार्थ, राजस्थान, हिमाचलप्रदेश. त्यामुळं संघाच्या टीकाकारांमध्ये केवळ होकारार्थी (Positive) आणि नकारार्थी असे दोन गट आहेत, असं मानून चालणार नाही. श्रीमती नयनतारा सैगल किंवा अच्युतराव पटवर्धन यांच्या अभिप्रायामध्ये संघाविषयी पुनर्विचार करण्याची इच्छा दिसते आणि देशातील एकमेव संघटित ताकद म्हणून ते संघाकडे पाहतात. असं पाहण्यातच एक भाबडेपणा दिसतो. दैनंदिन राजकारणाचं अज्ञान दिसतं. संपूर्ण क्रांतीच्या बाबतीतसुद्धा जे. पीं.चं तेच झालं. भारतातल्या विरोधी पक्षांचं ध्रुवीकरण होऊन काँग्रेसचा पाडाव, हे संपूर्ण क्रांतीच्या प्रारंभीचं चित्र ते पाहू शकले; पण त्यांच्या द्रष्टेपणाला त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिगत आणि परिस्थितीच्या दबावाखाली एकत्र झालेले विरोधी पक्ष, दोन्हीचा दबाव कमी होताच एकमेकात दैनंदिन, प्रांतीय, जिल्हावार राजकारणात कसे भांडतील हे काही दिसलं नाही. आमचे विचारवंत संघाकडून गांधीवाद अंगिकारण्याची व तो देशभर पसरवण्याची अपेक्षा करत आहेत, ती बरोबर आहे. कारण तो सर्वांत मोठा वारसा आहे आणि ही सर्वांत मोठी संघटना आहे; पण संघ असं काही करू लागताच आजवर ज्यांनी कामगारक्षेत्र, अल्पसंख्यांकांना हमी, दलितांचा उद्धार, आर्थिक पुनर्रचना ही आपली पैतृक राखीव क्षेत्रं मानली ते काँग्रेस, सर्वोदयी, साम्यवादी आणि समाजवादी पक्ष संघाला ही कामं सहजपणानं करू देणार नाहीत. उलट त्या भागात संघाच्या खच्चीकरणाचे प्रयत्न करतील, हे आमचे विचारवंत ओळखू शकले नाहीत. तेलीचेरीमधील रक्तपात हा अमुक भाग, अमुक कार्य ही आमची मक्तेदारी आहे, या भावनेतूनच मार्क्सवाद्यांनी सुरू केला.

## करुणाकरन यांची मुलाखत

आणीबाणीतील राजन-प्रकरणामुळे सत्तेवर आल्यानंतर थोड्याच दिवसांत मुख्यमंत्रिपद गमवावं लागलेले केरळमधील इंदिरा काँग्रेसचे नेते श्री. के. करुणाकरन यांची त्रिवेंद्रममध्ये मुद्दाम भेट घेतली. करुणाकरन यांचं व्यक्तिमत्त्व तर रुबाबदार आहेच; पण कितीही अडचणीत टाकणारा प्रश्न विचारला तरी डोळे मिचकावत, हसत उत्तर देण्याची त्यांची स्टाइल समोरच्या माणसाला निश्चितच प्रभावित करते. करुणाकरन यांची त्यांच्या पक्षाच्या ऑफिसमध्ये भेट घेतली तेव्हा इतरत्र असते तशीच इथेही कार्यकर्त्यांची वर्दळ होती. साहेबांचा दरबार नुकताच भरला असावा; पण आम्ही आल्याची वर्दी केबिनमध्ये जाताच सात–आठ खादीधारी मंडळी पटापट केबिनमधून बाहेर पडली आणि करुणाकरन यांनी अतिशय

प्रसन्न हास्य करत आमचं स्वागतं केलं. केरळमध्ये संघ वाढत आहे हे त्यांनीही मान्य केलं; पण याचं खापर ते मार्क्सवाद्यांवर फोडून मोकळे झाले. श्री. करुणाकरन म्हणाले—

' मार्क्सवाद्यांच्या हिंसक कृत्यांमुळे केरळात संघाला पाय रोवायला वाव मिळाला आहे. कारण जो मार्क्सवादी नसेल त्याला या लोकांनी जगणं मुश्कील करून टाकलं होतं. त्यामुळं एका शक्तीपासून बचाव करण्यासाठी दुबळा मनुष्य साहजिकच दुसऱ्या शक्तीचा आश्रय घेतो. आणि केरळात हा पर्याय संघानं दिला. आमच्या इंदिरा काँग्रेसमधील कार्यकर्त्यांवरदेखील या मार्क्सवाद्यांनी हल्ले चढवले. त्यांच्या केळी-नारळीच्या बागा उद्ध्वस्त केल्या. मुलांना बेदम मारहाण केली. कित्येक कार्यकर्त्यांना ठारदेखील मारलं; पण आम्ही अशा हल्ल्यांचा प्रतिकार करणारी संघटना उभारली नाही. कारण काँग्रेसचा हिंसेवर विश्वास नाही !'

' केरळात संघ वाढण्याचं आणखी एक कारण म्हणजे इथलं सरकार इतर गटांना देत असलेलं अवास्तव महत्त्व. अल्पसंख्यांकांना प्राधान्य आणि संरक्षण द्यायला आमची हरकत नाही; पण तसं करत असताना इतर गटांवर अन्याय होता कामा नये. केरळातल्या आघाडी-सरकारनं हे तारतम्य राखलं नाही. त्यामुळं साहजिकच असंतुष्ट झालेला, असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ लागलेला मोठा गट संघाकडे ओढला जात आहे. '

केरळातील मार्क्सवादी आणि संघवाल्यांच्या संघर्षाचं हे पृथक्करण करत असतानाच करुणाकरन यांनी एक मुद्दा मात्र वारंवार मांडला. तो म्हणजे ' काहीही झालं तरी आम्ही मात्र दोन्हींपैकी कोणत्याच गटामध्ये जाणार नाही. कारण आम्ही अहिंसेचे पुजारी आहोत !'

करुणाकरन हे मोठे मुरब्बी, मुत्सद्दी आणि कोणताही पक्ष अंगावर आला तरी डोळे मिचकावत, हसत उत्तरं देणारे चव्हाण-स्टाइलचे राजकारणी आहेत. त्यांच्या बोलण्यात अभिनिवेश नसायचा. केरळातील पोटनिवडणुकीच्या निकालानंतर त्यांचं विरोधी पक्षनेतेपदही जवळजवळ गेल्यासारखंच होतं. राजकारणातले लहान चढ-उतार करुणाकरन सहज पचवत असावेत. आमच्याशी बोलताना त्यांनी प्रथम ' एवढी पोरं पुण्याहून आली आहेत, तर बोलू या दहा मिनिटं,' असा विचार ठेवला असावा आणि लगेच बाराव्या मिनिटाला ' पुण्याला केव्हा निघणार, इकडं काय काय बघितलं ' अशा निरवानिरवीच्या गोष्टी सुरू केल्या. आम्ही म्हटलं, ' पुण्याला जाऊ तेव्हा जाऊ; पण आम्हाला तुम्हाला बरेच प्रश्न विचारायचे आहेत. ' मग साहेब खुलले आणि तास–सव्वा तास मुलाखत चालू राहिली. एप्रिल ७७ हा power–seekers चा महिना असताना तुम्ही मात्र पॉवर सोडून दिली, असं म्हणताच करुणाकरन चांगलेच खूष झाले. राजन-प्रकरणी राजीनामा दिल्याबद्दल आपल्याला कोणताही पश्चात्ताप होत नाही, असं त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितलं. कदाचित एकीकडं देशभर काँग्रेसच्या हातातून सत्ता जात असताना ती केरळात आपल्या हातून जाण्यापेक्षा दुसऱ्याच्या हातून गेलेली बरी, असा विचारही त्यांनी केला असेल आणि ती गेलीच. दुसरीकडे अलाहाबाद-प्रकरणात इंदिराजींनी केलेली चूक आपण या प्रकरणात करू नये, हे समजण्याइतके करुणाकरन शहाणे आहेत.

हिंसाचारी पक्षाकडे लोक का वळतात, असा प्रश्न विचारताच करुणाकरन म्हणाले की, ज्या दुकानात एखादी वस्तू मिळते तिकडे लोक जातात. आम्ही म्हटलं, ' पण एखादा दुकानदार एखादी वस्तूच का ठेवतो ? तिची आवड का निर्माण करतो ?' यावर म्हातारबुवांनी डोळे मिचकावून फक्त हास्य केलं. केरळबाहेर यांचा स्वतःचा पक्ष हिंसाचारावरच जगतो आहे, हे काय त्यांना माहीत नाही ? अरस-प्रकरणानंतर करुणाकरन काय करतील, हे आत्ता सांगणं कठीण आहे; पण त्या वेळी तरी इंदिरा गांधींविषयक प्रश्नांना त्यांनी मोकळेपणाने उत्तरं दिली. कोणत्याही पक्षात सहज जाऊ शकेल इतका हा मनुष्य ' लवचिक ' आणि ' धोरणी ' वाटतो. तो काही ' मी काँग्रेसचा एकांडा शिलेदार ' असं म्हणून सहानुभूतीचा विषय होणार नाही.

या प्रकरणी केरळ विधानसभा, महत्त्वाची वृत्तपत्रं, महत्त्वाचे राजकीय पक्ष यांच्या प्रतिक्रिया या लेखात अजमावल्या. केरळचे शिक्षणमंत्री श्री. मोहम्मद कोया यांचीही भेट झाली; पण त्यांनीही सरकारी धोरणाला विसंगत असं अर्थातच काही सांगितलं नाही. चारी पोटनिवडणुकींत सत्तारूढ आघाडी कोसल्यामुळं मंत्री ठिकाणावर नव्हते आणि त्यांची डोकीही ठिकाणावर नव्हती. मुख्यमंत्री तर स्वतःच्या आघाडीसरकारच्याच काळजीत असावेत. या निवडणुकांचा माझ्या सरकारवर काही परिणाम होणार नाही, अशी पत्रकारांना मुलाखत देऊन मोकळे झाले आणि नंतर लगेच उजवा कम्युनिस्टपक्ष आणि नंतर सत्तारूढ पक्षाच्या विधिमंडळाच्या बैठकी झाल्या. त्यातच कॅबिनेट मीटिंगही झाली. त्यामुळं दोन–अडीच दिवस धावपळ करूनही हे लोक हाताला लागले नाहीत. त्यामुळे त्रिवेंद्रममधील सचिवालयाजवळील प्राणिसंग्रहालय पाहण्यातच आम्हाला अधिक आनंद मानावा लागला. तिथला वाघ वाघच दिसतो. वाघाला शेळीची अवकळा आणण्याची जादू इथं अजून जमलेली नाही !

आता पुन्हा एकदा या संघर्षातील जे मुख्य गट मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या पूर्वेतिहासाकडे आपल्याला वळलं पाहिजे. आपली कामं या दोन्हीही गटांनी कशी वाढवली ते पाहिलं पाहिजे. त्यामध्ये सध्याच्या संघर्षाची काही बीजं विखुरलेली दिसतात. त्याबद्दल पुढील अंकी !

(क्रमशः)

रंगभूमी । विनया खडपेकर

चर्चेच्या कार्यक्रमामुळे करमणूक झाली. करमणुकीच्या कार्यक्रमांनी शीण आला.

# अखिल भारतीय नाट्य-परिषद मेळावा

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने दिनांक १०, १३ व १४ जून १९७९ रोजी मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव-मार्ग, मुंबई, येथे नाट्यक्षेत्राशी संबंधित व्यक्तींचे स्नेहसंमेलन झाले.

रविवार दि. १० जून या दिवशी दुपारी अडीच वाजता परिसंवादाने कार्यक्रमास सुरुवात झाली. अ. भा. म. ना. परिषदेचे अध्यक्ष श्री. भालबा केळकर यांनी परिसंवादाचे अध्यक्षपद भूषविले होते. 'नाटककार आणि दिग्दर्शक : समन्वय की संघर्ष।' हा परिसंवादाचा विषय होता. या परिसंवादासाठी जी नावे जाहीर झाली होती त्यांपैकी सर्वश्री माधव मनोहर, मधुसूदन कालेलकर, अनिल बर्वे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, रत्नाकर मतकरी ही मंडळी उपस्थित नव्हती.

डॉ. ब. दि. कुलकर्णी यांनी विषयाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकाच्या निमित्ताने त्यांनी या विषयावरील आपल्या निबंधाचे वाचन केले. त्या निबंधाचा आशय असा—

नाटककार नाटक लिहितो शब्दरूपात. हे शब्द घेऊन दिग्दर्शक त्या शब्दांसह नाटक रंगमंचावर उभे करतो. रंगमंचावर मूळ शब्दही असतात, शिवाय अभिनयही असतो. हा अभिनय शब्दसंहितेनेच सुचविलेला असतो. नाटकाचा खरा प्रयोग त्या नाटकाच्या पुस्तकातच अमूर्तपणे उभा असतो. नाटक आणि नाट्यप्रयोग यामध्ये तत्त्वतः अभेदच असतो. मग 'नाटककार आणि दिग्दर्शक : समन्वय की संघर्ष' असा प्रश्न का उपस्थित होतो? अण्णासाहेब किर्लोस्कर किंवा देवल यांच्या काळी हा प्रश्न नव्हता. ते स्वतःच नाटककार आणि दिग्दर्शक होते. दिग्दर्शक नावाची जात जन्मालाच आली नव्हती. नाट्यनिर्मितीचे तंत्र सर्व बाजूंनी जसजसे वाढू लागले तसतसे त्यांना कलारूपात संश्लिष्ट करणे आवश्यक ठरले. दिग्दर्शकाचा जन्म यातून झाला. आज दिग्दर्शक ही नाट्यसृष्टीतील जवळजवळ सर्वाधिक महत्त्वाची व्यक्ती मानली जाते आणि आजची रंगभूमी ही दिग्दर्शकाची रंगभूमी असेच समजण्यात येते. आजचा नाट्यदिग्दर्शक केवळ नाट्यसंहिता interprete करतो असे नाही तर रंगमंचरचना, रंगभूषा, प्रकाश-ध्वनियोजना, नटांचा आंगिक-वाचिक अभिनय यांची हालचाल या साऱ्यावर त्याचे नियंत्रण असते. या साऱ्यांना एकात्मरूप देण्याची त्याची धडपड असते. यातून तो त्याला भावलेले नाटक एकजीव रूपात प्रेक्षकांपुढे उभे करतो.

रंगभूमी मुख्यतः दोन प्रकारची असते. कवी-नाटककाराची, की जी नाट्यकलेलाच अत्युच्च साहित्यरूप देते. उदा. शेक्सपियर, कालिदास यांची रंगभूमी Man of the letters who wrote for the theatre असे यांच्यासंबंधी म्हणता येते. या रंगभूमीला 'साहित्यरूप रंगभूमी' Literary Theatre म्हणतात आणि २. दुसरी रंगभूमी ही रंगकलेच्या विलासासाठी असते. दर्शनीय-प्रदर्शनीय असते. बॅले, ऑपेरा, तमाशा, Fairy Plays मेलोड्रामा यांची ही रंगभूमी असते. या रंगभूमीला रंगमयी रंगभूमी 'Theatrical theatre' म्हणतात.

Literary Theatre मध्ये दिग्दर्शकाला लेखकाच्या पावलांनीच जावे लागते.नाटककार व दिग्दर्शक यांच्यात अर्थ लावण्यावरून थोडे अंतर पडते. 'एकच प्याला' हे दारूच्या दुष्परिणामांचे नाटक मानावयाचे, की एखाद्या बुद्धिमान मानी पुरुषसिंहाच्या शोकान्ताचे नाटक मानून त्याला तशी अभिनयरीती योजायची? थिएट्रिकल थिएटर' हे पूर्णपणे दिग्दर्शकाच्या ताब्यात आले. नाट्यसंहितेला धरून तिच्या मर्यादेतच नाट्यप्रयोग बसविणे हे दिग्दर्शकाचे मूळ कार्य; पण नाट्यसंहिता ही प्राथमिक सामग्री मानण्याकडे दिग्दर्शकाचा कल झुकू लागला. या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणे हे तो आपले कर्तव्य मानू लागला. He used actors as a sculptor uses clay. पुढे तर नाटक हे निमित्तमात्रच तो गणू लागला. नाटकाने Theme द्यावी, फार तर स्थल-कालाची कल्पना द्यावी, यानंतरचे सर्व दिग्दर्शकाने करावे हा विचार बळावत जाऊ लागला. दिग्दर्शकाने फार साहित्यिक दृष्टीने नाट्यकृतीकडे बघण्याचे कारण नाही. His approach should not be literary. He should see the play itself in a new theatrical light—यासंबंधीचा विचार आणखी पुढे गेला नाट्यसंहिता सर्व काही बोलत नाही, सांगू शकत नाही. शब्द जेवढे सांगतील तेवढेच ती सांगू शकते. यापलीकडे एक नवा प्रांत लागतो—अ-बोल, गूढ, रहस्यमय. दिग्दर्शक ह्या भूमीला समूर्त करीत असतो, असा पक्ष मांडण्यात येऊ लागला आणि रंगभूमीवर नाट्यरचनेचे नवनवे आकृतिबंध येतात ते दिग्दर्शकाच्या नवनव्या निर्मिति-कल्पनांमुळेच, ह्यावर भर देण्यात आला. कोणतीही नाट्यकृती आपल्या प्रयोग-संकल्पनेप्रमाणे रंगमंचावर आणण्याचे दिग्दर्शकाला पूर्ण स्वातंत्र्य आहे, ही कल्पना प्रस्थापित झाल्यासारखी झाली. रंगमंचावरील नाट्यद्रव्य—नाटककाराचे शब्द, नट, प्रकाश, संगीत, नटांच्या हालचाली, रंगक्षेत्र, प्रेक्षागृह इ० काळजीपूर्वक उपयोजिले तर हवा तो नाट्यपरिणाम साधता येतो, असे दिग्दर्शक म्हणू लागले. नाटककाराने नाट्य-

संहितेत रंगसूचना देण्याचे कारण नाही. ते दिग्दर्शकाच्या क्षेत्रावर नाटककाराने केलेले अतिक्रमण ठरेल. नाटककाराने सुचविलेल्या कृतीपेक्षा दिग्दर्शकाला वेगळे सुचण्याची शक्यता असते, असे स्पष्ट सांगण्यात येऊ लागले. दिग्दर्शकाचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता एवढ्यावर थांबली नाही. नाटककाराने नाट्यकृती संपूर्ण लिहूच नये. अपुरेच नाटक दिग्दर्शकाच्या हाती द्यावे, ही अपेक्षा दिग्दर्शक करू लागले.

दिग्दर्शकाला आता आपली craft (कारागिरी) कलारूपात (Art form) प्रतिष्ठित करावीशी वाटते आहे. आज तो Theatre-crafts आंगिक अभिनय, देखावा, वेशभूषा, प्रकाश, संगीत, नृत्य इ. ह्या crafts उपयोजितो. त्याची कृती आज interpretative Art च्या स्वरूपात आहे. ती अद्याप स्व-अधिष्ठित नाही. रंगभूमीचे हे घटक पूर्णपणे स्वाधीन करता आले तर नाटककार–कवी यांना निरोप देऊनही आपल्या मनातील कल्पना–विचार भावना शब्दरूपाविनाही प्रेक्षकांपर्यंत पोचविता येतील, असे दिग्दर्शकाचे आजचे स्वप्न आहे. Stage without poet, without play-wright ' असा काहीसा प्रयत्न आपणाकडेही होऊ लागला आहे. ' Director–author relationship ' यापुढे अप्रस्तुत तर ठरणार नाही ना ?

## संघर्षात्मक समन्वय

डॉ. व. दि. कुलकर्णींनी सुरुवातीलाच विषय सांगोपांग मांडल्यामुळे परिसंवादाला एक निश्चित दिशा आली. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या आधारानेच पुढील चर्चा झाली. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी संघर्षाची काही आंतरिक, काही व्यावहारिक कारणे सांगितली. लेखक, दिग्दर्शक दोघेही प्रतिभाशाली असले की, संघर्ष होतो. या दृष्टीने अच्युत वझे यांच्या 'सोफा कम बेड' या नाटकाचे उदाहरण त्यांनी दिले. या नाटकाचा प्रयोग सत्यदेव दुबे यांनी एका पद्धतीने सादर केला. स्वतः अच्युत वझे यांनी दुसऱ्या पद्धतीने सादर केला. दारव्हेकर यांच्या मते दोन्ही प्रयोग आपापल्या परीने श्रेष्ठ होते. श्री. दारव्हेकर असेही म्हणाले, ' बलदंड नाटककार दिग्दर्शकाला सांगतो, ' माझं पंधरावं नाटक आहे. तुझं तिसरंच. तू गप्प बैस ! ' असा पवित्रा घेतला की, पावित्र्य जाते. नाटक प्रयोगक्षम हवे. प्रयोगशरण नको. लेखक, दिग्दर्शक यांनी वाद घालून संघर्षात्मक समन्वय साधावा. '

यानंतर श्री. सुरेश खरे यांनी आपले विचार मांडले. त्यांच्या मते दिग्दर्शक craftsman आहे. creative artist नाही. मातीचा पुतळा घडवून दिला. तो अलंकृत करण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची. तो पुतळा साठ वर्षांचा असेल तर पस्तीस वयाचा दाखविण्याचा दिग्दर्शकाला अधिकार नाही रंगभूमीचा विकास व्हावयाचा असेल तर लिटररी आणि थिएट्रिकल रंगभूमी हातात हात घालून गेली पाहिजे. श्री. वि. भा. देशपांडे यांच्या मताप्रमाणे प्रयोगाचे यशापयश देण्याघेण्याचा प्रश्न येतो तेव्हा संघर्षाला सुरुवात होते. नाटक चांगले चालू लागले की, लेखकांना, दिग्दर्शक, कलाकार सगळ्यांनाच वाटू लागते, ते माझ्यामुळेच चालते. मग संघर्ष उद्भवतो. लेखक ज्या अर्थी म्हणतात अमुक दिग्दर्शकाला मी नाटक देणार नाही त्या अर्थी दिग्दर्शकाला महत्त्व आहे. राजा नातू यांच्या दृष्टिकोनातून असा संघर्ष खरे म्हणजे असूच शकत नाही. नाटक आवडते म्हणून दिग्दर्शक ते घेतो. रंगभूमीच्या चौकटीत बसवताना संघर्ष सुरू होतो. त्यांनी या संदर्भातील त्यांचे अनुभव सांगितले. एका नाटककाराने दहा प्रयोगांचे मानधन आधी मागितले. प्रेक्षक काहीही सहन करतात अशी तक्रार त्यांनी केली. श्री. विहंग नायक उपस्थित नसल्यामुळे त्यांचे भाषण श्री. शशिकांत नार्वेकर यांनी वाचून दाखवले. सर्वसामान्य समाज नाटक पाहणे पसंत करतो म्हणून दिग्दर्शकाला महत्त्व येते. चूक कोण, बरोबर कोण हे संदर्भावरून ठरते. संघर्ष असावा की नसावा याबद्दल प्रश्न उद्भवू शकतो. समन्वय मात्र असावाच असे विचार श्री. नायक यांनी व्यक्त केले होते. श्री. नार्वेकर तोंडात पान ठेवून वाचत होते. त्यामुळे त्यांचे वाचन स्पष्ट ऐकू येत नव्हते.

नंतर श्री. भालबा केळकर यांच्या विनंतीवरून श्री. कमलाकर सोनटक्के, सौ. सुहासिनी मुळगावकर, श्री. दाजी भाटवडेकर, श्री. कमलाकर नाडकर्णी ही मंडळी बोलायला पुढे आली. श्री. कमलाकर सोनटक्के म्हणाले, " दिग्दर्शक कारागिरीशी थांबत नाही. तो लिखित – अलिखित नाट्यसंहितेचा भाष्यकार असतो. मी रेग्यांचे नाटक बसवले. गंगाधर गाडगिळांचे 'ज्योत्स्ना आणि ज्योती' केले. संघर्ष येतोच कुठे ? " गद्य नाटकावर खूप चर्विचर्वण झाल्यामुळे सुहासिनी मुळगावकर यांनी संगीत नाटकाचा झेंडा उभारला. त्यांनी सांगितलं ' संगीत हा रंगभूमीचा आवश्यक घटक आहे. संगीत नृत्याची जाण दिग्दर्शकांना आवश्यक आहे. या मूडला हा राग पाहिजे हे समजले पाहिजे. ' श्री. दाजी भाटवडेकर यांनी शंकराचार्य वगैरे बडी नावे घेऊन शेवटी म्हटले, ' वैचारिक घासाघीस अटळ आहे. भांडणामुळे सर्वनाश होईल असे करू नये. संघर्ष अटळ आहे. समन्वय अपरिहार्य आहे. ' कमलाकर नाडकर्णी यांनी उभे राहून सांगितले. ' विषयाला सोडून बोलायचे तर तर खूप बोलता येईल. विषयाला धरून बोलायचे तर मला जे काही बोलायचे आहे ते वि. भा. बोलून चुकले आहेत. '

काही प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. नारायण आव्हाड म्हणाले, ' मी बालगंधर्वांपासून नाटके पाहिली; पण संघर्ष तेव्हा चव्हाटयावर येत नव्हता. प्रेक्षकांना नाटक आवडलं नाही तर उपयोग काय ? ' श्री. तु. श्री. इनामदार अमाप उत्साहाने बोलले. ' दिग्दर्शक स्वतःला शहाणे समजतात. इतरांची नाटके बदलतात. आठ-दहा पोरं माथेरानला जाऊन नाटक रचतात. छबिलदासमधे करतात, चित्तरंजन कोल्हटकर हा एकच नट सुधाकरची भूमिका पेलू शकतो, ' असे बरेच काही सांगून त्यांनी थोडा वेळ मजा आणली.

डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी परिसंवादाच्या समारोपात म्हटले : दिग्दर्शक नाट्यसंहितेचं प्रकटीकरण ( revealation ) करीत असतो. पाषाणातून मूर्ती निर्माण होते तेव्हा त्या पाषाणाचे आणि शिल्पकाराच्या व्यक्तिमत्त्वाचेही प्रकटीकरण होत असते. नाटकाची प्रकृती ओळखून तशी अभिनयरीती देणे दिग्दर्शकाचे काम आहे. काही मर्यादेत त्याला कलास्वातंत्र्य आहे.

श्री. भालबा केळकर आपल्या शेवटच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले : लेखक, दिग्दर्शक सगळ्यांनाच एक खंत दिसते. खंत करणे चुकीचे. जमिनीशी थोडा संघर्ष होतो म्हणून आपण चालू शकतो. समन्वय पूर्ण झाला की,

घसरायला होते. एखाद्या नाटककाराच्या नाटकाचे पाच दिग्दर्शकांना पाच अर्थ आढळले आणि पाची प्रयोग यशस्वी झाले तर कोणाला वाईट वाटण्याचे कारण नाही. नटेश्वर-नारीच्या संसारासारखा नाटचसंसार असावा. नटेश्वर जरी मालक असतो तरी महत्त्वपूर्ण स्थान असते नारीलाच. लेखक–दिग्दर्शकांचे संबंध असे असावेत.

यानंतर शशिकांत नार्वेकर यांनी आभार-प्रदर्शन केले आणि या दिवशीचा कार्यक्रम संपला.

बुधवार दि. १३ जून रोजी अ. भा. म. ना. परिषद वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.

## कलावंत आणि व्यसनासक्ती

गुरुवार दि. १४ जूनच्या कार्यक्रमाची सुरुवात थोडी निराळी झाली. श्री. कमलाकर सारंग यांनी पुरंदरे सभागृहाच्या दारात उभे राहून येणाऱ्या प्रेक्षकांना पत्रके वाटली. ही पत्रके म्हणजे दि. ३ एप्रिल १९७९ च्या 'महाराष्ट्र टाइम्स'च्या अग्रलेखाचा काही भाग होता. त्याचा आशय असा– 'नाटच-परिषदेच्या अध्यक्षपदावर भालबा केळकरांची नियुक्ती झाल्यापासून त्यांचे सत्कार रिवाजा-प्रमाणे सुरू झाले आणि सत्काराच्या सभांपासून आजतागायत जवळजवळ प्रत्येक भाषणात भालबांनी नाटचकलेपेक्षा नटांच्या व्यसनावर वक्तव्य करण्यास महत्त्व दिले. नैतिकतेचा कैफ चढल्यामुळे ते म्हणतात, 'व्यसनी कलावंतास मी कलावंत नव्हे तर कारागीर मानतो!' वास्तविक कारागीर कोण व कलावंत कोण हे कलेच्या कसोटी-वरून ठरविले पाहिजे!' ठीक साडेनऊ वाजता नटराजपूजन झाले. अत्तरगुलाब शिंपडले गेले. पेढे वाटले. दहा वाजेपर्यंत अल्पोपहारही आटोपला. नंतर सभेला सुरुवात झाली. कार्याध्यक्ष श्री. पांडुरंगराव शिरोडकर यांनी उपचाराचे प्रास्ताविक भाषण केले. देवलांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चित्रप्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. उपचाराचा समारंभ झाल्यावर श्री. कमलाकर सारंग यांनी आपले विचार मांडले : व्यसनी म्हणजे काय? व्यसन निषिद्ध की व्यसनामुळे घडणारी अनुचित कृती निषिद्ध? भालबांना व्यावसायिक कलावंताच्या जीवनाचा अनुभव नाही. व्यावसायिक कलावंत महिन्याचे वीस वीस दिवस घराबाहेर असतात. प्रयोगामागून प्रयोग आणि प्रवास करताना थकवा येतो. तेव्हा मद्याची आवश्यकता भासते. रंगदेवतेचं पावित्र्य भंग झालं तर निषेध करावा; पण कलावंताच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप करण्याचा कोणाला अधिकार नाही.' भालबा केळकर म्हणाले– 'सारंगांच्या मताशी मी सहमत आहे. विरोध नाहीच. वैज्ञानिक दृष्टिकोनातून मी व्यसन वाईट म्हणतो.' नंतर प्रायव्हेट, पब्लिक, सुनियंत्रित व्यक्तिमत्त्व, 'मी विज्ञानाचा प्राध्यापक' असे बरेच काही ते बोलले. त्यांचे बोलणे अतिशय भोंगळ होते. त्याचे सूत्र सापडणे कठीण. त्यांच्या बोलण्याचा सारांश असा– 'व्यसनाशी माझ्या कोणत्याही नीतीच्या कल्पना निगडित नाहीत, तर आरोग्याच्या दृष्टीने ते घातक आहे. त्यामुळे कलाकाराचे व्यक्तिमत्त्व सुनियंत्रित राहत नाही. म्हणून मी व्यसन निषेधार्ह मानतो.' त्यांच्या बोलण्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. भालबांनी स्वतःची विज्ञानक्षेत्रातली कामगिरी सांगितली. चाळीस पुस्तके लिहिली. अमुक रिसर्च केला वगैरे. याशी मराठी रंगभूमीला काय करायचे आहे? रंगभूमीच्या व्यासपीठावरून रंगभूमीबद्दलच बोलणे आवश्यक नाही का? गप्पांमध्ये मग्न असलेले केशवराव दाते क्षणात रंगमंचावरच्या अभिनयाशी एकरूप होत याचे कौतुक केळकर करतात. मद्याच्या नशेतल्या माणसाने रंगमंचावर चोखपणे भूमिका केली तर ती कारागिरी mechanically वावरणे असे का म्हणतात?

शिवाय त्यांनी असेही सांगितले, 'नटांनी पूर्ण निर्व्यसनी आणि चारित्र्यवान असण्याचे ॲक्टिंग करावे.' या कारागिरीवर ते समाधान पावतील असे त्यांच्या बोलण्याच्या स्वरावरून वाटले. असेही वाटले, मद्यपानाला खरे म्हणजे त्यांचा नैतिक विरोध आहे; पण तो कबूल न करता ते एकसारखे वैज्ञानिक विरोध म्हणत होते. एकंदरीत या मद्यपान-प्रकरणात त्यांच्या अंगात मोरारजीभाईच शिरलेले दिसतात! असो.

यानंतर निरनिराळ्या संघांचे प्रमुख बोलले. निर्मातासंघाच्या वतीने श्री. भाऊसाहेब सप्रे बोलले. अतिशय थोडक्यात त्यांनी आपल्या संघाच्या कार्याची माहिती आणि अडचणी मांडल्या. एकंदर निर्माते सत्तेचाळीस आहेत. पाचसहाच निर्माते सुस्थितीत आहेत. गोडाउन्स नाहीत, घरे नाहीत अशी स्थिती आहे. नवीन कलावंत कसे मिळवावेत हा नेहमीच प्रश्न असतो. काम करण्यासाठी कार्यकर्ते नाहीत. या व्यवसायात चढउतार फार आहेत. अपेक्षा चुकतात. मंगेशकर नाटचगृह वाटलं होतं तेवढं सुरुवातीला चाललं नाही. नाटचसंमेलन ही निर्मात्यांची जबाबदारी मानतो. शिबिरांकडे नवे कलाकार मिळविण्यासाठी लक्ष ठेवतो, वगैरे.

कलाकारसंघाच्या वतीने श्री. जयंत सावरकर आणि श्री. गणेश सोळंकी बोलले. गेल्या पाच वर्षांत संघाने काही केले नाही अशी स्पष्ट कबुली त्यांनी दिली. सभासद सभेला उपस्थित रहात नाहीत. घरे, औषधे यासंबंधीच्या योजना आखल्या. त्याचाही फायदा घेत नाहीत. 'निर्मात्यांबद्दल गोंडस चित्र उभं केलं गेलं तसं मी कलाकारसंघाबद्दल बोलू इच्छित नाही.' असे म्हणून श्री. जयंत सावरकर यांनी निर्मातासंघावर दुगाण्या झाडल्या. 'कमिटीने आत्मसंशोधन केले का?' (सारंग) 'आम्हीही सभासदांकडून तीच अपेक्षा करतो' (सावरकर) असे सवालजबाब होऊन त्यांची भाषणे संपली. हौशी रंगमंचसंघाच्या श्री. बापू लिमयांनी श्री. सोळंकी आणि सावरकर यांची 'री' ओढून कार्यकर्ते नसल्यामुळे काहीच काम न झाल्याचे सांगितले.

यानंतर सौ. सुहासिनी मुळगावकर यांनी आपली नाटचसंगीत प्रशिक्षण योजना ऊर्फ रत्नपारखी योजना समग्र विदित केली. गायनात निपुण नटनटी मिळविणे असा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेतर्फे नाटचसंगीताची स्पर्धा घेण्यात येईल. चाचणी स्पर्धा १२ ऑगस्ट ७९ या दिवशी होईल. अंतिम स्पर्धा ९ सप्टेंबर रोजी होईल. सुहासिनीबाईंनी कळकळीने, तळमळीने सांगितले, 'मराठी संगीत रंगभूमी जगात एकमेव आहे. ती जपली पाहिजे. संगीत रंगभूमीला अभिनय नाही अशी गद्य नटांनी आमच्यावर तप्तमुद्रा ठोकून ठेवली आहे, ती मला खोडून काढायची आहे. सर्वांनी या योजनेचा फायदा घ्यावा!' श्री. शंतनुराव किर्लोस्कर, माधवराव आपटे, ब्रिजलाल बियानी ट्रस्ट, महिंद्र आणि महिंद्र, रजनी

डहाणूकर यांनी अनुदाने किंवा तत्सम सहाय्य जाहीर केल्याचे बाईंनी सांगितले आणि महाराष्ट्रातल्या धनिकांच्या रसिकतेवरचा आपला दृढ विश्वास ठासून व्यक्त केला. संगीताच्या आराधनेने आणि धनिकांच्या रसिकतेमुळे बाई आता काय भव्यदिव्य करून दाखविणार इकडे आमचे डोळे लागले आहेत !

सुहासिनीबाईंच्या भाषणानंतर श्री. भालचंद्र पेंढारकरांनी 'दारव्हेकरांनी महामंडळाचा राजिनामा द्यावा' अशी मागणी करून सनसनाटी वातावरण निर्माण केले; पण ते फार काळ टिकले नाही. शासनाच्या महामंडळात राहून नाटचपरिषदेसाठी किंवा रंगभूमीसाठी दारव्हेकरांनी काय केले अशी विचारणा झाली. यावर 'तेथे मी एकटाच नाही. विजया मेहताही आहेत. अध्यक्ष शांतारामबापू आधी चित्रपटांबद्दल बोलतात. मग नाटकांबद्दल काही सुरुवात करीपर्यंत त्यांची वेळ संपून जाते. चित्रपटाचे सगळे प्रश्न संपले की नाटकांमधे लक्ष घालायला सुरुवात होईल. माझ्या राजिनाम्याने काय होणार–देईन–' अशी गुळमुळीत उत्तरे श्री. दारव्हेकरांनी दिली.

## जुन्या आठवणी

याच दिवशी दुपारी तीन ते सहापर्यंत 'रंगभूमीवरील अनपेक्षित घटना' नाटचक्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचे स्वानुभवकथन हा कार्यक्रम झाला. सर्वश्री रा. वि. राणे, गणेश सोळंकी, परशुराम सामंत, प्रभाकरपंत जोशी, बाळ कोल्हटकर, भालचंद्र पेंढारकर, मामा पेंडसे, चंद्रकांत गोखले यांनी आपले अनुभव सांगितले. रा. वि. राणे यांनी सांगितले. एकदा बेबंदशाही नाटकात राजाराम (राम कुलकर्णी) 'हुजुरच्या पायाची आण घेऊन सांगतो' याऐवजी म्हणाला, 'हुजुरच्या पायाची वहाण घेऊन सांगतो–' एकदा मानापमानमधे राणे यांनीही असाच विनोद केला. वाक्य होते 'आपल्या पराक्रमामुळे बायकांनासुद्धा शत्रूची भीती वाटेनाशी झाली आहे.' त्याऐवजी राणे म्हणाले–'शत्रूंनासुद्धा बायकांची भीती वाटेनाशी झाली.' राणे यांनी एकच प्याला नाटकात बालगंधर्वांची कवळी पडल्याची आठवण सांगितली. गंधर्वांची लोकप्रियता आणि दबदबा असा की कोणी हसले नाही. राणे यांनी अनुभव साभिनय सांगितले. तेव्हा त्यांच्या अभिनयसामर्थ्याचीही झलक मिळाली.

श्री. परशुरामपंत सामंत यांनी गणपतरावांची पिण्याबद्दलची कीर्ती ऐकून आपण त्यांच्यावर कसे लक्ष ठेवले; परंतु ते नाटकापूर्वी एक तास थिएटरमध्ये येत ते जाईपर्यंत कधी प्यायलेले दिसले नाहीत ही आठवण सांगितली. लोकमान्य गेले. नाटक मधेच बंद केले. एक चकार शब्द न काढता अतिशय शांतपणे प्रेक्षक बाहेर पडले. ते टिळकांच्या दर्शनाला गेले, अशीही एक आठवण सामंत यांनी सांगितली. भालचंद्र पेंढारकरांनी एक गमतीदार आठवण सांगितली. कोणीसा नट हाफ पँटवर मेकअपसाठी बसला होता. नांदी म्हणायला सगळ्यांबरोबर रंगमंचावर आला. डोळे मिटलेले. बाकीची पात्रे निघून गेली. पडदेवाल्याने चुकीने पडदा उघडला. समोर हाफपँटमध्ये अर्धवट चेहरा रंगवलेला हा प्रेक्षकांना दिसला. चंद्रकांत गोखल्यांनी सांगितले, 'जिजाऊने बाण मारला. मी ठरल्याप्रमाणे मरून पडलो. प्रेक्षकांचा जोरात हशा ऐकू आला. डोळे किलकिले करून पाहिले तर बाण माझ्यापर्यंत पोचण्याऐवजी जिजाऊच्या पायाशीच पडला होता!' या जुन्या नटांच्या आठवणी अशा गमतीदार होत्या. रंगभूमीच्या प्रेमाने ही माणसे बोलत होती. केवळ मनोरंजनार्थ बोलत नव्हती. लँग्याच्या, सुरवारींच्या नाड्या सुटल्याच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या; पण सांगताना मर्यादा सोडली नाही. श्री. गणेश सोळंकी यांनी मात्र सभेत आरीष्ट अनुभव गलिच्छपणे सांगितले. 'पान त्रेचाळीस सुरू होतं आणि पान बावनवर एंट्री म्हणून बाई बाथरूममध्ये गेली. इकडे नटवर्यांनी एकदम बावन पानावर उडी मारली. बाई बाथरूममध्ये नऊवारी नेसलेली, किती वेळ लागेल––' 'रश्मीची भूमिका करणारा पुरुषनट गावाला गेला. दुसरा तयार झाला. स्त्रीची भूमिका करायची म्हणजे जे पाहिजे ते कुठून असणार! त्याने दोन बनपाव मागितले.' श्री. गणेश सोळंकी यांच्या पंधरावीस वर्षांच्या रंगभूमीवरील कारकीर्दीत सहज स्मराव्यात अशा याच आठवणी का?

१४ जून रोजीच सायंकाळी सात ते साडेसातपर्यंत डॉ. अ. ना. भालेराव नाटचगृहात श्री. सदानंद वर्दे यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिकवितरणाचा कार्यक्रम झाला. या समारंभास माननीय महापौर राजाभाऊ चिबुलकरही उपस्थित होते.

रात्री साडेआठनंतर 'आबूरावाचे लगीन' 'परिकथेतील राजकुमार' 'बिचारा डायरेक्टर', 'चंद्र आणि कमलिनी मीलन'–छायानाटच, काही नाटचप्रवेश असे बरेच विविध करमणुकीचे कार्यक्रम होते. आबुरावाचे लगीन एवढा एक कार्यक्रम बरा झाला; परंतु तो आता खूप जुना झाला आहे. बाकी सर्व कार्यक्रम मराठी प्रतिभेचे आणि कलाविष्काराचे दारिद्र्यच दाखविणारे होते. 'अखिल भारतीय' नाटचपरिषदेचे कार्यक्रम असल्यामुळे ते अधिकच हास्यास्पद वाटत होते. एखाद्या चाळीच्या गणेशोत्सवाचा दर्जा त्या कार्यक्रमांना होता. पु. शि. रेगे यांच्या 'गाणारे झाड' या टॅब्लोचा कार्यक्रम नेहमीपेक्षा वेगळा होता. मुलांच्या पोशाखातून आणि उभे राहण्याच्या मांडणीतून झाडाचा आकार उत्कृष्ट साधला होता. मुलांनी विविध आवाज काढून पक्ष्यांच्या आवाजांचा परिणामही सुंदर साधला होता. प्रकाशयोजना अतिशय कुशलतेने वापरून झाड कोसळण्याचा परिणाम देणेही जमले होते. तंत्र उत्तम होते; पण मंत्र प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकत नव्हता.

असे हे संमेलन पार पडले. डॉ. ब. दि

कुलकर्णींचा निबंध एवढी एकच समाधान देणारी गोष्ट. श्री. भालबा केळकर यांनी प्रांतीय रंगभूमीचे कम्युनिकेशन साधण्याच्या दृष्टीने Inter Provincial Project आखले ही दुसरी महत्त्वाची गोष्ट. बाकी चर्चेच्या कार्यक्रमामुळे करमणूक झाली. करमणुकीच्या कार्यक्रमामुळे शीण आला आणि संमेलन संपले.

सर्व कार्यक्रम वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपले ही महत्त्वाची गोष्ट. *

## कलारंगनिर्मित

# ' आरोप '

### कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय

या नाटकाचा तेविसावा प्रयोग शिवाजी-मंदिर, दादर येथे सादर झाला.

शेखर आणि मोहिनी पती-पत्नी. शेखर शिल्पकार आहे. मोहिनीचे ब्यूटी पार्लर आहे. मोहिनीने स्वतःच्या पैशांनी समुद्राकाठी एक श्रीमंती फ्लॅट घेतला आहे. मोहिनीला हे कसे परवडते याचे शेखरला आश्चर्य वाटते. राजवाडे नावाचा उद्योगपती—मोहिनीचा मानलेला पालक—आणि मोहिनी यांचे काही तरी लफडे आहे असा शेखरच्या मनात सतत संशय आहे. त्या दृष्टीने तो मोहिनीला एकसारखे छेडतो. शेखरवर खरेखुरे प्रेम करणारी मोहिनी आपले हे लफडे लपवू पहाते. शेखरचा त्याच्या व्यवसायाचा जम बसला की आपण राजवाड्यांच्या पकडीतून सुटू अशी तिला आशा आहे. संशयग्रस्त शेखर राजवाड्यांचा खून करतो. मोहिनीकडून त्यांच्या संबंधाची कबुली घेण्यासाठी खुनाचा आरोप तिच्यावरच लादतो. तिने कबुली दिल्यावर त्याचे समाधान होते. तो स्वतःहून पोलिसस्टेशनला फोन करतो.

ठराविक पद्धतीचे फार्स, त्यातले बाष्कळ विनोद पाहून कंटाळलेल्या प्रेक्षकांना श्री. सुरेश खरे यांनी लिहिलेले आणि श्री. कमलाकर सारंग यांनी दिग्दर्शित केलेले हे 'आरोप' पाहिल्यावर, काही तरी वेगळे पाहिल्याचे क्षणभर समाधान वाटते; पण क्षणभरच ! रहस्यात गुंतून पडलेले आपले मन त्यातून बाहेर पडले की, जाणवते, कथेचा मसाला नेहमीचाच आहे. तो फार तर नाटकात नवीन आहे. अनेक चित्रपट, कथा, रहस्यकथा यातून आलेला आहे. यात पैशाच्या जोरावर स्त्रियांच्या अगतिकतेचा फायदा उपटणारा पुरुष आहे. प्रियकराचे अहंकारी मानसशास्त्र आहे. 'माझ्यावरच्या प्रेमामुळेच तू त्याच्या मागणीला नकार दिलास ना ?' असे शेखर मोहिनीला पुनः-पुन्हा विचारतो तेव्हा काही तरी मानसशास्त्र सांगितल्याचे समाधान लेखकाला आणि ऐकल्याचे समाधान प्रेक्षकाला मिळते. शेवटी स्वतःचा गुन्हा प्रामाणिकपणे कबूल करणारा आणि त्याची शिक्षा भोगायला तयार असलेला प्रामाणिक 'हिरो' आहे. सुटण्याची शक्यता असतानाही, केवळ किंचित घाईने फोन केल्याने 'हिरोला' कोठडीकडे नेणारे क्रूर दैव आहे. अशा या ठराविक घटकांवरच कथावस्तू उभी आहे.

नाटकाचा प्रयोग अगदी निर्दोष आहे. तीन अंकांत केवळ दोनच पात्रे शेखर (जयराम हर्डीकर) मोहिनी (लालन सारंग) रंगमंचावर वावरतात; परंतु कंटाळवाणा तोचतोचपणा येत नाही. कलाकारांचा सुजाण परिपक्व अभिनय हे याचे कारण आहे. नवीन घेतलेला फ्लॅट मात्र नवा कोरा वाटत नाही. फर्निचर व पडदे जुनाट दिसतात. फर्निचरला पॉलिश नव्हते. त्यावर चरे पडलेले दिसत होते. श्री. जयराम हर्डीकर हे लालन सारंग यांच्यापुढे कोवळे दिसत होते. जोडी शोभत नव्हती. एक प्रसंग खटकतो. आपल्या हाउसगाउनवरचे खांद्यावरचे कव्हर काढून, मोहिनी शेखरला उत्तानपणे म्हणते, 'माझ्याकडे बघ !' पतिपत्नींच्या नात्यात हे वेश्येसारखे आव्हान कशासाठी ? यातून देहप्रदर्शनाच्या सनसनाटीपलीकडे काय साधले आहे ? स्त्रीदेहप्रदर्शन चित्रपटातून भरपूर चाललेच आहे. आता ते आणखी नाटकात कशासाठी ?

एकंदरीत सुमार असले तरी खुनाचे रहस्य आणि कलाकारांचे उत्कृष्ट अभिनय यामुळे पकड घेणारे हे नाटक आहे. □


**New Titles Received**

| | | |
|---|---|---|
| 1. **Vivien X Leigh** – (Biography) – Anne Edwards | Rs. | 21·75 |
| 2. **Bests In My Belfry** – (Incidents with and anecdotes of animals in the inimitable Durrel style) – Gerald Durrel | ,, | 11·85 |
| 3. **Hungry As the Sea** – (Bestseller Thriller) – Wilbur Smith | ,, | 35·00 |
| 4. **Thus Spoke Zarathustra** – (The most controversial Philosophical book) – Nietzsche | ,, | 14·35 |
| 5. **The Hynek UFO Report** – (The most authentic book on UFO) – Dr. J. Allen Hynek | ,, | 16·05 |
| 6. **Overload** – Arthur Hailey | ,, | 16·95 |
| 7. **My Contact With UFOs** – (Cosmology-Translated from Portuguese) – Dino Kraspedon | ,, | 14·35 |
| 8. **Mukajji's Visions** – (1977 Bharatiya Jnanpith Award winning novel) – Dr. K. Shivram Karanth | ,, | 8–00 |
| 9. **If I Am Assassinated** – Zulfikar Ali Bhutto | ,, | 35·00 |
| 10. **Wind In The Tower** – (Biography) – Han Suyin | ,, | 18·35 |
| 11. **Dynasty** – (Bestseller – Novel) – Robert Elegant | ,, | 15·35 |
| 12. **Magic & Mystery In Tibet** – (Occultism) – Alexandra David-Neel | ,, | |
| 13. **Three Lives** – (Occultism) – Lobsang Rampa | ,, | 12·70 |
| 14. **An Autobiography** – Agatha Christie | ,, | 25·35 |
| 15. **An Iuheritance** – (Memoirs) – Dhanvanthi Rama Rau | ,, | 50·00 |

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

## बजाज-ऑटोमधील गोळीबाराच्या निमित्ताने

पृष्ठ ३ वरून

झाली ? यात कामगारांचा काहीच वाटा नाही का ? आणि मग त्यांच्या कल्याणाची जबाबदारी कोणाची ? याची उत्तरे टाळून फक्त दोन युनियन्समधील संघर्ष ही धूळफेक चालू आहे. मुळात येथे फक्त चटर्जींचीच युनियन प्रभावी आहे. या प्रकरणावर २१ तारखेला झालेल्या शनिवारवाड्यावरच्या सभेत इंटकपासून सर्व कामगार-संघटनांनी एक मुखाने कामगारांना पाठिंबा दिला. संघटनांची अंतर्गत खेचाखेच हे किमान येथे तरी कारण नाही.

साचत आलेल्या असंतोषाला वेळच्या वेळी उभयपक्षी सन्मान्य अशी तडजोड काढून जर आळा घातला असता तर ही वेळ आलीच नसती.

The House of Bajaj & ethics in business वर उपरोल्लेखित Business India मध्ये म. गांधींची Trusteeship ची कल्पना आम्ही शक्यतो आचरणात आणत आहोत असा रामकृष्ण बजाज यांचा दावा आहे. त्यांच्या कानावर ह्या सगळ्या गोष्टी काय गेल्या नसतील ? □

# सुभजय : नुकसानभरपाईचा प्रश्न

पुण्याच्या औद्योगिक परिसरातला एक छोटासा कारखाना. टी. व्ही. रेडिओ, इ. उपकरणांचे सांगाडे हे या कारखान्याचं उत्पादन.

या कारखान्याचे ९४ कामगार गेल्या एक जूनपासून आपल्या मागण्यांसाठी चिवटपणे झुंज देत आहेत. विशेष म्हणजे सुमारे वीस-पंचवीस महिला-कामगारही ह्या लढ्यात सक्रीय भाग घेत आहेत.

सुभजयच्या लढ्याचा इतिहास थोडक्यात असा : सुभजय हा चार भागीदारांनी चालविलेला कारखाना. हा कारखाना भागीदारांनी विकायला काढला. खरेदी-विक्रीचा व्यवहार पक्का झाला. ३० मेला आधीच्या मालकांनी कारखान्याचा ताबा सोडायचा असे ठरविले. त्याप्रमाणे दोन महिने अगोदर कामगारांसाठी नोटीसही लागली; पण मालकाचा आणि कामगारांचा व्यवहार मात्र तसाच लोंबकळत पडला.

पगारवाढीसाठी कामगारांनी लेबरकोर्टात केस लावली होती. तिचा निकाल अद्याप लागलेला नव्हता. नव्या मालकाने ही केस कामगारांनी काढून घ्यायला हवी असा आग्रह धरला.

वर्षाला १५ दिवस याप्रमाणे कायम कामगारांना नुकसानभरपाई मिळणार होती. याशिवाय मे महिन्याचा पगार आणि ग्रॅच्युइटी हे देखील बाकी होतंच. कामगारांचा हा हिशोब आधीच्या मालकाला चुकता करणं भाग होतं.

आधीच्या मालकाच्या विनंतीनुसार केस काढून घेण्यास कामगारांनी नकार दिला. केसच्या मोबदल्यात नुकसानभरपाईचा दर वाढवावा असा आग्रह धरला. या वाढीव दराने नुकसानभरपाई द्यायला मालक कबूल होईनात. मात्र ३० मेपर्यंत हिशोब नक्की चुकता होणार आहे असं आश्वासन मालकांनी दिलं. कामगारही त्याच समजुतीनं राहिले.

अखेर ३० मे उजाडला. हा जुन्या मालकांच्या कारकीर्दीचा शेवटचा दिवस. कामगार मालकांची वाट पहात होते.

पण मालकांचा पत्ता कुठे ? संध्याकाळचे चार वाजेपर्यंत वाट पाहिली. मालकांनी तोंडही दाखविले नाही. हे पहाताच कामगार खवळले.

काय करावं ? नोकरी गेलेली तर स्पष्ट दिसतच होती; पण नुकसानभरपाई तरी मिळणार की नाही ? असा प्रश्न उभा राहला.

शिवाय कायद्याप्रमाणे कारखाना विकल्याच्या दिवशी किंवा काही दिवसांच्या मुदतीमध्ये नुकसानभरपाई द्यायलाच हवी असं मालकावर बंधन नाही.

५००० रुपयांच्या नुकसानभरपाईच्या कागदावर सही करून घेऊन नाडलेल्या कामगारांच्या हातात ५०० च रुपये दिल्याची उदाहरणं स्वतःच पाहिलेली.

अशा परिस्थितील करायचं काय ?

कारखान्याचा ताबा घ्यायचा ! कामगारांनी ठरवलं. स्त्री-कामगारांनीही कामगारांना साथ द्यायचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशी सकाळी परत यायचं कबूल करून त्या घरोघर गेल्या.

दुसऱ्या दिवशी पाहतात तर राखीव पोलिसांनी पुरुष कामगारांना हुसकलेलं. कारखान्याच्या गेटाशी त्यांच्या गाड्या उभ्या ! हे पहाताच स्त्री-कामगारांनी हिकमतीनं मागच्या बाजूनं कारखान्यात प्रवेश केला अन् घोषणा द्यायला सुरवात केली. हे पहाताच पुरुष- कामगारांनीही कुंपणावरून इमारतीत प्रवेश केला आणि राखीव पोलिसांशी झगडून कारखान्याच्या इमारतीचा ताबा घेतला.

तेव्हापासून इमारतीत कामगार आणि पोलीस बाहेर असे दृश्य ! स्त्रियांनीही रात्रपाळी-दिवसपाळी स्वतःला लागू केलेली. आलटून-पालटून त्या झोपायला येतात.

कारखान्याचं उत्पादन बंद आहे. खोल्यांना कुलुपं लागलेली आहेत. कारखान्याची कसलीही नासधूस कामगारांनी केलेली नाही. त्यांना करायचीही नाही. नव्या मालकाच्या ताब्यात कारखाना देण्यापूर्वी आधीच्या मालकाने भेट द्यावी आणि कामगारांशी चर्चा करून कामगारांचा हिशोब चुकता करावा एवढीच कामगारांची रास्त मागणी आहे.

हा लढा जरी नुकसानभरपाईच्या हिशोबासाठी प्रामुख्यानं चाललेला असला, तरी कामगारांसमोर नोकरीचा प्रश्न आहेच...नवी नोकरी मिळणार कशी ? आधीच्या नोकरीचे सर्टिफिकेट देण्याइतपत तरी जुन्या मालकाने तोंड दाखवायला नको ? आधीच्या मालकाने तर हिशोब मांडलाय तोट्याचा. मे महिन्याचाही पगार देता येत नाही म्हणे. कामगारांना प्रश्न पडतो की, इतका जर तोटा झाला तर काही मालकांच्या (भागीदारांच्या) स्वतःच्या मालकीचे कारखाने उभे राहिले ते कुणाच्या जिवावर ?

सुरुवातीला कारखान्यांच्या परिसरातच घोषणा देण्यात आल्या.

कामगारांच्या मागण्यांचे फलक जागोजाग लागले; पण तेवढ्याने मालकावर कसा दबाव येणार? मग कामगारांनी त्यांच्या घरांवर निदर्शनं केली. त्या दिवशी स्त्रिया कारखान्यावर थांबल्या.

सुभजयचा लढा अजून चालूच आहे. या लढ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्त्रियांचा या लढ्यातला सहभाग. सुमारे वीस स्त्रिया देहूरोड, पर्वती असं लांबलांबून दररोज कारखान्यात येत आहेत. गार फरशीवर झोपत आहेत. यातल्या बहुतेक स्त्रियांवर घरची जबाबदारी आहे. काहींच्या बाबतीत तर त्याच एकट्या कमावत्या आहेत. ज्या हिरीरीनं त्यांनी या लढ्यात भाग घेतला ती नक्कीच कौतुकास्पद आहे. याचा अर्थ हा लढा घराचा उंबरठा ओलांडून थेट स्वयंपाकघरात घुसला आहे.

सुभजयचे कामगार संघटित आहेत; पण लघुउद्योगात काम करणारे बहुसंख्य कामगार असंघटित आहेत. कामगारवर्गाने आपल्या संघटित ताकदीच्या जोरावर आपल्या मागण्या धसाला लावू नयेत यासाठी मालकवर्ग निरनिराळ्या युक्त्या लढवतो. कित्येक ठिकाणी कामगार कंत्राटानेच कामाला लावले आहेत. त्यामुळे त्यांना कायम करण्याचा, त्यामागोमाग येणारे फायदे देण्याचा प्रश्नच येत नाही किंवा नोकरीला घेतानाच सहीनिशी राजीनामाही घेतलेला. जरा कुठे हालचाल दिसली की, राजीनामा पास करून पार! सुभजयचे कामगार आपल्या संघटनेच्या जोरावर आपले प्रश्न धसाला लावू शकले. असे जरी असले तरी सुभजयच्या कामगारांसमोरचे प्रश्न हे खाजगी उद्योगात काम करणाऱ्या हजारो कामगारांचे प्रश्न आहेत.


सुभजयने आज नुकसानभरपाईचा प्रश्न लावून धरला आहे. कामगारांच्या दृष्टीने हा अत्यंत तातडीचा प्रश्न आहे. मालकाने आपला कारखाना विकला असता, कामगारांना द्यायचा नुकसान-भरपाईचा दर अतिशय अपुरा आहे, यात वादच नाही. याशिवाय विशिष्ट मुदतीतच ही नुकसानभरपाई देण्याचं बंधन मालकावर नसणं कामगारांच्या दृष्टीनं अन्यायाचं आहे; पण या प्रश्नांबरोबरच विशेषतः स्त्री-कामगारांसमोर, नोकरीचा प्रश्न आहे. बायकांच्या बाबतीत बाळंतपणाची रजा, पाळणाघराची सोय इतकी खटपट कुणी करा! म्हणजे बायकांना नोकरी मिळणं मुश्किलच. नोकरीचा हा प्रश्न सर्वच कामगारांना भेडसावतो आहे. आठ-आठ, दहा-दहा वर्षं काम केलेल्या कामगारांना नोकरीसाठी वणवण फिरावं लागणार. शिवाय नोकरीस सुरुवात किमान वेतनापासून! खाजगी छोट्या उद्योगात निदान किमान वेतन तरी मिळेल याची तरी काय हमी?

म्हणजेच कारखान्याची विक्री करताना कारखान्यातल्या कामगारांच्या नोकरीचीही तड लागायला हवी. कारखाना विकल्यानंतर त्यात जर उत्पादन चालू रहाणार असेल, तर त्याच कामगारांना कामावर घेणं मालकाला बंधनकारक हवं किंवा जर उत्पादन बंद होणार असेल तर अशा कामगारांच्या रोजगाराची हमी सरकारने घ्यायला हवी.

अर्थात हा प्रश्न सुभजयच्या मूठभर कामगारांनी नाही तर संपूर्ण कामगारचळवळीनेच धसाला लावायला हवा.

— सरिता देवस्थळे


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे